रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २९७ । पृष्ठे ८ ▌RGD/016/2026-28 www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६

किंमत ४ ₹


## न्हावाशेवा पाणी योजना पुन्हा रखडली


**पनवेल** : पनवेलकरांच्या पाण्याच्या आशा पुन्हा एकदा लांबणीवर पडल्या आहेत. डिसेंबर २०१९ मध्ये मोठ्या अपेक्षांसह सुरू झालेली न्हावाशेवा पाणीपुरवठा योजना (टप्पा ३) अजूनही पूर्णत्वास पोहोचलेली नाही. मार्च २०२६ पर्यंत पाणीपुरवठा सुरू होईल, अशी घोषणा करण्यात आली होती. मात्र, कामातील विलंब, प्रशासकीय अडथळे आणि समन्वयाच्या अभावामुळे आता ही योजना थेट डिसेंबर २०२६ पर्यंत ढकलली गेली आहे.या योजनेतून पनवेल महानगरपालिकेला १०० एमएलडी पाणी मिळणार आहे. त्यासाठी पालिकेने तब्बल १७३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. •➤ पान २ वर


## आईस क्यूब फॅक्टरी

भाड्याने देणे आहे

- मुख्य वैशिष्ट्ये -

- पूर्णतः कार्यान्वित आईस क्यूब प्लांट
- शुद्ध पाण्यासाठी RO सिस्टीम कार्यरत
- ३ फेज इंडस्ट्रियल इलेक्ट्रिकल कनेक्शन
- हक्काचा आणि मुबलक पाणी पुरवठा (Water Source)
- तयार माल साठवण्यासाठी १ टन क्षमतेचे कोल्ड स्टोरेज
- प्रस्थापित डिस्ट्रिब्युशन नेटवर्क (वितरण व्यवस्था)




संपर्क: 98509 80530 / 75078 01905


# महसूल विभाग निद्रावस्थेत ?



- उसडीत बेकायदेशीर खाण सुरु
- तहसीलदारांचे कारवाईकडे दुर्लक्षचा आरोप

**। मुरुड । प्रतिनिधी ।**

मुरुड-जंजिरा तालुक्यातील उसडी येथे बेकायदेशीर स्टोन क्रशर आणि दगड खाण प्रकरणात महसूल व पोलीस प्रशासनाने यापूर्वी कोट्यवधींची कारवाई करूनही पुन्हा उत्खनन सुरू झाल्याने महसूल विभागाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला असून, प्रशासनाविरोधात उघड नाराजी व्यक्त होत आहे. तहसीलदारांकडे तक्रार करुनही राजकीय वरदहस्तामुळे कारवाईकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या दगड खाणीमुळे केवळ पर्यावरणालाच नव्हे, तर या खाणीपासून काहीच अंतरावर असलेल्या चिचघर धरणाच्या सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित झाला असून, धरणाला काही धोका झाल्यास उन्हाळ्यात अनेक गावांना पाणीटंचाईचा गंभीर फटका बसू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय ही खाण महामार्गालगत असल्याने मोठ्या अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही •➤ पान २ वर

### चिचघर धरणाला वाढता धोका

उसडी येथील बेकायदेशीर स्टोन क्रशर आणि दगड खाणीच्या अगदी वरच्या बाजूस असलेल्या चिचघर धरणाच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या धरणातून राजपुरी, आगरदांडा, मिठागर, उसडी, खामदा, सावली, टोकेखार आदी गावांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, स्टोन क्रशरमुळे होणाऱ्या सततच्या हादऱ्यांमुळे धरणाला धोका निर्माण झाला आहे. जर ऐन उन्हाळ्यात धरणाला काही अपघात झाला, तर अनेक गावांवर भीषण पाणीटंचाईचे संकट कोसळू शकते, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे. तरीही प्रशासन या गंभीर बाबीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.



> उसडी येथील बेकायदेशीर स्टोन क्रशर आणि दगड खाणीविरोधात वारंवार तहसीलदारांकडे तक्रार केली आहे. मात्र, राजकीय वरदहस्तामुळे प्रशासन कारवाईकडे दुर्लक्ष करत आहे. आता मी कोकण आयुक्तांकडे तक्रार करणार असून, न्याय न मिळाल्यास बेमुदत उपोषण करणार आहे.
>
> – महेश ठाकूर, तक्रारदार

## खालापुरात भोंदूबाबाकडून विवाहितेवर अत्याचार

- विधीच्या नावाखाली महिलेचे शोषण
- खालापूर पोलिसांकडून भोंदूला अटक

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

राज्यात सध्या भोंदू कॅप्टन अशोक खरातने भविष्य सांगण्याच्या नावाखाली महिलांचे शोषण केल्याच्या आरोपांमुळे आधीच भोंदूबाबांबाबत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणामुळे राज्यात संतापाची लाट असतानाच रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात आणखी एक धक्कादायक आणि संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. जादूटोणा व अंधश्रद्धेच्या नावाखाली एका विवाहित महिलेला फसवून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी पोलिसांनी एका भोंदूबाबाला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सांताक्रूझ (मुंबई) येथील एका विवाहित महिलेला तिच्या पतीच्या प्रेयसीमुळे वैवाहिक वाद निर्माण झाला होता. या समस्येवर उपाय मिळावा या हेतूने ती आपल्या वडिलांच्या ओळखीतील •➤ पान २ वर

नवऱ्यावर त्याचंच स्पर्म वापरून काळीजादू केल्याचा दावा त्याने संबंधित महिलेसमोर केला. काळी जादू उतरवण्यासाठी त्याने महिलेवर वारंवार अत्याचार केले. जवळपास ऑगस्ट २०२४ ते डिसेंबर २०२४ या दरम्यान महाड, पनवेल, नवी मुंबई येथे बोलवून बाबाने अत्याचार केला, असे पीडित महिलेने पोलीस तक्रारीत म्हटले आहे. महाराष्ट्र नरबळी आणि जादूटोणा प्रतिबंध कायद्यानुसार बाबा जान याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## वेधक

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**पेण** : पेण-वाशीवली परिसरात अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून छेडछाड केल्याचा गंभीर आणि संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. मुलगी टपरीवर एकटी बसलेली असताना आरोपीने तिच्याशी जवळीक साधत ''मला तुझ्याशी लग्न करायचे आहे'' असे सांगितले. मुलीने नकार दिल्यानंतरही आरोपीने तिच्यावर दबाव आणत मोबाईल देण्याचे आमिष दाखवले आणि लपून-छपून संपर्क ठेवण्यास सांगितले. यानंतर आरोपीने मुलीचा •➤ पान २ वर

### चार तरुणांचा बुडून मृत्यू

**छ. संभाजीनगर** : शहरालगत असलेल्या हर्सूल तलावात पोहण्यासाठी गेलेल्या चार तरुणांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. या घटनेनं परिसरात शोककळा पसरली असून, शोक व्यक्त होत आहे. हर्सुल तलावात तरुण मुले बुडाल्याची माहिती अग्निशामक दलाला मिळाली होती. त्यानुसार, बचावकार्य करत तिघांचे मृतदेह तुरुंगातून बाहेर काढण्यात आले. दरम्यान, तलावाच्या दुसऱ्या बाजूला आणखी एक तरुण बुडाल्याची माहिती मिळाल्यानंतर शोधमोहीम राबवली असता चौथ्या तरुणाचाही मृतदेह आढळून आला.

### खरातची ईडी चौकशी होणार!

**मुंबई** : भोंदू अशोक खरात प्रकरणात राज्य सरकारकडून कठोर कारवाई केली जाणार, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. खरातच्या आर्थिक व्यवहारांपासून ते महिलांवरील अत्याचारांपर्यंत सर्व बाबींचा सखोल तपास सुरू असून, दोषींना कडक शिक्षा दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. फडणवीस म्हणाले की, खरातचे विविध प्रकारचे आर्थिक व्यवहार शोधून काढले जात आहेत. त्यांची संपूर्ण मालमत्ता, गैरव्यवहार आणि महिलांवरील अत्याचार या सर्व बाबी उघड करून कठोर शिक्षा देण्यात येईल.

### चाकणकरांच्या विरोधात लेटरबॉम्ब

**बीड** : भोंदू अशोक खरात प्रकरणात बीडमधून आलेल्या निनावी पत्रामुळे मोठी खळबळ उडाली आहे. या पत्रात रुपाली चाकणकर यांचे नाव समोर आल्याने वाद अधिकच चिघळला आहे. संबंधित पत्रात त्यांच्या आशीर्वादाने बीडमधील महिला पदाधिकारी खरातकडे जात असल्याचा दावा केला आहे. दरम्यान, राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या हेमा पिंपळे यांनी या पत्राची गंभीर दखल घेत, त्याची सत्यता तपासण्याची मागणी केली आहे. पोलीस अधीक्षकांनी सुमोटो गुन्हा दाखल करून एसआयटीमार्फत चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## महाडमध्ये शिक्षकी पेशाला काळीमा

- दहावीच्या विद्यार्थ्याचे लैंगिक शोषण
- खासगी शिकवणी घेणाऱ्या शिक्षकाचे संतापजनक कृत्य

**। महाड । प्रतिनिधी ।**

विद्येचे मंदिर मानल्या जाणाऱ्या शिक्षण क्षेत्रातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. महाड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका खासगी क्लासच्या शिक्षकाने शिक्षकी पेशाला काळीमा फासण्याचा संतापजनक प्रकार केला आहे. दहावीत शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थ्याचे वेळोवेळी लैंगिक शोषण केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, संपूर्ण परिसरात खळबळ माजली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन बालक हा महाड येथील एका खासगी क्लासमध्ये दहावीच्या शिक्षणासाठी जात होता. जून २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत आरोपी शिक्षकाने क्लासच्या दरम्यान पीडित बालकासोबत अश्लील कृत्ये केली. एवढेच नव्हे तर, सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या दरम्यान आरोपीने आपल्या क्रूरतेची सीमा ओलांडली. तक्रारीनुसार, आरोपीने शिकवणीच्या वेळी पीडित बालकाला क्लासच्या वरच्या मजल्यावर असलेल्या स्वतःच्या बेडरूममध्ये नेले. तिथे त्याला जबरदस्तीने बेडवर झोपवून, त्याचे कपडे काढून त्याच्यासोबत अनैसर्गिक आणि अश्लील कृत्ये केली. तसेच वेळोवेळी विद्यार्थ्याला मिठी मारून विचित्र पद्धतीने स्पर्श करत त्याचे लैंगिक शोषण केले.

सततच्या या छळाला कंटाळून अखेर याप्रकरणी फिर्याद देण्यात आली. महाड शहर पोलिसांनी या घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपीविरुद्ध गुन्हा गुन्हा नोंदवला आहे. आरोपीवर बाल लैंगिक अत्याचार संरक्षण अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा पुढील अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. वालकोळी हे करत आहेत. या घटनेमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, आपल्या पाल्यांना खासगी शिकवणीला पाठवताना सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नराधम शिक्षकावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## चणेरा ग्रामस्थांचा संताप उफाळला

### अपूर्ण रस्त्यामुळे १४ एप्रिलला ‘जेल भरो’ आंदोलनाचा इशारा

**। रोहा । प्रतिनिधी ।**

चणेरा-बिरवाडी-पांगळोली-उसर मार्गे रोहा या बहुचर्चित रस्त्याचे काम रखडल्याने चणेरा परिसरातील ग्रामस्थांचा संताप उफाळून आला आहे. प्रशासनाच्या उदासीनतेला कंटाळून ग्रामस्थांनी आता १४ एप्रिल रोजी ‘जेल भरो’ आंदोलनाचा इशारा दिला आहे.

या रस्त्यासाठी राज्य शासनाने सुमारे पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर करून १६ ऑक्टोबर २०२३ रोजी कामास सुरुवात करण्याचे आदेश दिले होते. मात्र, ठेकेदाराकडून केवळ अंशतः काम करण्यात आले असून, आजही रस्ता अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

या कामासाठी जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश विचारे यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. काम वेळेत पूर्ण न झाल्याने १२ मे २०२५ रोजी रास्ता रोको आंदोलनही करण्यात आले होते. त्यावेळी अधिकाऱ्यांनी ३१ मे २०२५ पर्यंत रस्ता वाहतुकीस योग्य करण्याचे लेखी आश्वासन दिले. मात्र, पावसाचे कारण पुढे करत काम लांबणीवर टाकण्यात आले. यानंतर ३१ डिसेंबर २०२५ आणि पुढे ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली, तरीही काम पूर्ण झालेले नाही. उलट, अपूर्ण काम असूनही ठेकेदाराला मोठ्या प्रमाणावर बिल अदा करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. प्रशासन आणि ठेकेदाराच्या हलगर्जी कारभाराविरोधात •➤ पान २ वर

## पनवेलमध्ये ७०० चौरस फुटांपर्यंत करमाफीला ब्रेक

### महसुलावर परिणाम होणार म्हणून प्रशासन ठाम; विरोधक आक्रमक

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पालिकेत ७०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ता करमाफी देण्याच्या मागणीला अखेर प्रशासनाने स्पष्ट नकार दिला आहे. वाढत्या विकासकामांसाठी मोठ्या निधीची गरज असल्याने अशी करमाफी सध्यातरी शक्य नसल्याचे पालिकेने सांगितले.

शहरात जलद गतीने वाढणारी लोकसंख्या, नव्या गृहनिर्माण प्रकल्पांची भर आणि पायाभूत सुविधांवरील वाढता खर्च लक्षात घेता पालिकेला स्थिर महसूल आवश्यक असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे करमाफी दिल्यास आर्थिक तूट वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

पालिका आकडेवारीनुसार, शहरातील बहुतांश घरे ही ७०० चौ.फुटांच्या आत येतात. या मालमत्तांकडून दरवर्षी मिळणारा १९ ते २३ कोटी रुपयांचा महसूल हा विकासकामांसाठी महत्त्वाचा स्रोत मानला जातो. हा महसूल बंद झाल्यास विविध प्रकल्पांवर परिणाम होऊ शकतो, असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

दरम्यान, मुंबई महानगरपालिकेप्रमाणेच पनवेलमध्येही करमाफी •➤ पान २ वर

> सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी पालिकेने मालमत्ता करमाफीचा निर्णय घ्यावा. त्यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक मदत होईल.
>
> – अरविंद म्हात्रे, विरोधी पक्षनेते

## स्पाच्या नावाखाली कुंटणखाना



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

बॉडी मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या कळंबोलीतील एका स्पा सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने छापा टाकून पती-पत्नीला अटक केली आहे. तसेच एका पीडित महिलेची येथून सुटका केली आहे.

कळंबोली, सेक्टर-१६ मधील निलकंठधाम इमारतीतील गोल्डन किंग सलून आणि स्पा येथे मसाज पार्लरच्या आडून वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे •➤ पान २ वर

## लग्नाळू तरुणांना मुलगी मिळेना!



- लग्न जुळवताना मुलांच्या वडिलांची दमछाक
- दोन महिने उरले तरी शोध सुरूच

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

''तुम्ही फक्त मुलगी द्या, लग्नाचा सगळा खर्च आम्ही करतो!'' अशी विनंती करूनही मुलांसाठी वधू मिळत नसल्याचे चित्र सध्या रायगड जिल्ह्यात दिसून येत आहे. यंदाच्या वर्षातील मुहूर्तांपैकी विवाहासाठी केवळ दोन महिने उरले असतानाही मुलांचे वडील अजूनही मुलींच्या शोधात फिरत असल्याने त्यांची मोठी दमछाक होत आहे.

विवाह इच्छुक वरांच्या पालकांना सध्या वेगळ्याच समस्येला सामोरे जावे •➤ पान २ वर


## झेरॉक्स सेंटरमध्ये कामासाठी जागा भरणे आहे

उमेदवार - महिला

शिक्षण - १२ वी पास

आकर्षक पगार

संपर्क - सुखसागर भवन दुसरा माळा, BVM टॉकीजच्या मागे, अलिबाग, रायगड ४०२ २०१

महेश भोसले : 8483999229



भारताची स्वतःची सेंट्रल बँक डिजिटल करन्सी (सीबीडीसी)

Cash, but Digital !

रोख रकमेसारखे व्यवहार करा

सीबीडीसी: आरबीआयने जारी केलेली डिजिटल रुपी

✔ तुमच्या डिजिटल वॉलेटमध्ये साठवलेली

✔ सुट्टे पैसे शोधण्याची गरज नाही

✔ UPI QR सह सर्व QR कोडवर चालते

✔ व्यवहार करण्याचा सुरक्षित मार्ग

डिजिटल रुपी FAQs साठी स्कॅन करा

तुमचे डिजिटल रुपी ॲप डाउनलोड करा

Google Play किंवा App Store







हरमिलन बॅन्स,
भारतीय ट्रॅक ॲथलीट

अधिक माहितीसाठी,
https://rbikehtahai.rbi.org.in/cbdc वर जा

अधिकृत व्हॉट्सॲप नंबर्स:
99990 41935 / 99309 91935

सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**सहभागी बँका:** ॲक्सिस बँक • बँक ऑफ बडोदा • बँक ऑफ इंडिया • बँक ऑफ महाराष्ट्र • कॅनरा बँक • फेडरल बँक • एचडीएफसी बँक • आयसीआयसीआय बँक • आयडीबीआय बँक • आयडीएफसी फर्स्ट बँक • इंडियन बँक • इंडसइंड बँक • कर्नाटक बँक • कोटक महिंद्रा बँक • पंजाब नॅशनल बँक • स्टेट बँक ऑफ इंडिया • युको बँक • युनियन बँक ऑफ इंडिया • येस बँक

**सहभागी नॉन-बँका:** क्रेड • मोबिक्विक

# कर्जत शहरातील एकमेव मैदान बंदिस्त करू नये

## कर्जत शहर शिवसेना ठाकरे पक्षाची मागणी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पोलीस मैदान शहरातील एकमेव खुले मैदान आहे. या मैदानाची मालकी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून या मैदानाला संरक्षण भिंत घालण्यासासाठी दोन कोटींचा निधी मंजूर आहे. मात्र, खेळासाठी तसेच सार्वजनिक वापरासाठी असलेले हे एकमेव मैदान असून, या मैदानाला संरक्षण भिंत घातली जाऊ नये, अशी मागणी करणारे निवेदन कर्जत शहर शिवसेना ठाकरे पक्षाकडून निवेदन देऊन करण्यात आले.



कर्जत शहरातील ऐतिहासिक सभांचे साक्षीदार म्हणून कर्जत शहरातील पोलीस मैदान ओळखले जाते.यामैदानाचीमालकीसार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून, या मैदानावर पोलिसांची वसाहत तसेच कर्जत पोलीस ठाण्याची इमारत आणि जिल्हा पोलीस उपअधीक्षक यांचे कार्यालयाची इमारत वगळता अन्य कोणतीही वास्तू नाही. सार्वजनिक बांधकाम खात्याचे मालकीचे हे मैदान असलेतरी त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम खात्याचे कोणतेही कार्यालय अथवा वास्तू नाही. या मैदानावर शहरातील विविध धार्मिक कार्यक्रम असतात, तर इतर वेळी हे मैदान वाहनाच्या पार्किंग साठी वापरले जाते. त्या पार्किंगसाठी कोणताही मोबदला पोलीस किंवा नगरपरिषद किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून आकाराला जात नाही. त्यामुळे हे मैदान आओ जावो घर तुम्हारा अशा प्रकारे वापर होत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हे मैदान दगडी कुंपण घालून बंदिस्त करण्याच्या हालचाली सुरु आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या भूमिकेला सर्व थरातून विरोध होत असून, बांधकाम विभागाने या कामासाठी काही निधीदेखील मंजूर केला आहे. त्यामुळे कर्जत शहरातील नागरिकांनी बांधकाम खात्याच्या या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. त्याबद्दल शिवसेना ठाकरे पक्षाने कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देऊन विरोधाची भूमिका घेतली आहे. कर्जत शहर शाखेच्यावतीने बांधकाम खात्याचे उपअभियंता राहुल देवांग यांना निवेदन देऊन ही मागणी केली आहे. कर्जत शहर उपप्रमुख कृष्णा जाधव यांनी हे निवेदन दिले असून, त्यावेळी शिवसेना ठाकरे पक्षाचे कर्जत तालुका प्रमुख बाजीराव दळवी, कर्जत पंचायत समितीच्या उप सभापती चित्रा ठाकरे, माजी उपसभापती पंढरीनाथ राऊत, तसेच तालुका सहसंपर्क प्रमुख रामदास घरत जगदीश ठाकरे अजय कराळे आदी उपस्थित होते. शिवसेना ठाकरे पक्षाने त्या ठिकाणी मैदान बंदिस्त करण्याचा प्रयत्न झाल्यास आंदोलनाची भूमिका घेतली जाईल, असा इशारा दिला आहे.

# बदलत्या काळातही बैलगाडीचे महत्त्व कायम

## ग्रामीण भागात आजही शेतकऱ्यांची विश्वासू साथी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी एकेकाळी ''सुपरफास्ट एक्स्प्रेस'' मानली जाणारी बैलगाडी आजही शेतीकामात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नागमोडी वाटा, कच्चे रस्ते किंवा शेतशिवारातून सहज मार्ग काढत मालवाहतूक करणारे हे पारंपरिक साधन आजही अनेक शेतकऱ्यांचा आधार आहे.


(छायाचित्रः गणेश चोडणेकर)

प्राचीन काळापासून वाहतुकीचे प्रमुख साधन असलेल्या बैलगाडीला विशेष स्थान होते. राजवटीत रथ जसा महत्त्वाचा होता, तसाच शेतकऱ्यांसाठी बैलगाडीचा उपयोग होता. घरासमोर बैलगाडी असणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जात असे. त्या काळात रस्त्यांचा अभाव असल्याने दळणवळणासाठी बैलगाडीचाच मोठ्या प्रमाणात वापर होत असे. काळानुसार तंत्रज्ञान विकसित झाले आणि विजेवर चालणाऱ्या यंत्रसामग्रीमुळे लाकडी बैलगाड्यांची जागा लोखंडी बैलगाड्यांनी घेतली. त्यानंतर ट्रॅक्टर, रिक्षा, टेम्पो यांसारखी आधुनिक वाहतूक साधने उपलब्ध झाली. त्यामुळे शेतीची कामे वेगाने आणि सोप्या पद्धतीने होऊ लागली. तरीही, ग्रामीण भागात विशेषतः भातशेतीसाठी बैलगाडीचे महत्त्व अजूनही टिकून आहे. शेतातील पेंढा वाहणे, भात भरडणे, गवत, शेण आणि इतर साहित्याची वाहतूक करण्यासाठी बैलगाडीचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दैनंदिन कामात तिचे योगदान आजही महत्त्वाचे ठरते.

मात्र, बदलत्या परिस्थितीमुळे बैलगाडीची संख्या कमी होत चालली आहे. शेतीचे विभाजन, घटते उत्पन्न, नैसर्गिक आपत्ती आणि तरुण पिढीचे शेतीकडे होत असलेले दुर्लक्ष यामुळे बैलगाडीचा वापर घटला आहे. गुरेपालनासाठी लागणारा चारा व पाण्याची टंचाई, तसेच वणव्यामुळे नष्ट होणारे गवत यामुळेही शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण होत आहेत. या सर्व कारणांमुळे तालुक्यात आता मोजक्याच बैलगाड्या उरल्या असून, त्यादेखील नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. तरीसुद्धा, ग्रामीण भागातील शेतीकामासाठी बैलगाडी आजही एक विश्वासू आणि किफायतशीर पर्याय म्हणून टिकून आहे.

# मोहोपाड्यात अतिक्रमण उद्ध्वस्त

। रसायनी । प्रतिनिधी ।

मोहोपाडा बाजारपेठेत बेकायदेशीर अतिक्रमणाचा कहर शिगेला पोहोचला असून सर्वसामान्य नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहायला मिळत आहे. रस्त्यांवरच दुकाने थाटून बसलेल्या व्यावसायिकांमुळे निर्माण झालेल्या भीषण वाहतूक कोंडीवर अखेर पोलिसांनी ॲक्शन मोडमध्ये प्रवेश केला आहे.




मोहोपाडा-चांभार्ली मार्गावर अनेक दुकानदारांनी आपल्या दुकानाचा पसारा थेट रस्त्यावर मांडत सार्वजनिक जागेचा अक्षरशः बेकायदेशीर ताबा घेतला आहे. फळे, भाजीपाला, विविध साहित्य तसेच जाहिरातींचे फलक रस्त्यावर ठेवल्यामुळे वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. याचा सर्वाधिक फटका शालेय विद्यार्थी,कामगार आणि दैनंदिन प्रवाशांना बसत आहे.

दररोज वाढणारी कोंडी, नागरिकांचा त्रास आणि प्रशासनाकडे होणाऱ्या तक्रारींचा भडका उडाल्यानंतर रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी आता थेट मैदानात उतरून अतिक्रमणधारकांना अंतिम इशारा दिला आहे.विक्रेत्यांनी रस्त्याचा काही भागांवर ताबा दाखविण्यास सुरुवात केल्याने वाहतूक कोंडी होवून अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.हिच परिस्थिती मोहोपाडा बाजारपेठेत दिसून येते.

### पोलिसांकडून कारवाई

रस्त्यावरचा एकही इंच व्यापू नका, अन्यथा दंडात्मक आणि कठोर कायदेशीर कारवाईस तयार राहा! असा सज्जड दम त्यांनी दुकानदारांना भरला आहे. यापुढे रस्त्यावर माल, स्टॉल किंवा फलक आढळल्यास कोणतीही सूट न देता थेट कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. सार्वजनिक रस्त्यांवर दादागिरी करणाऱ्यांच्या विरोधात पोलिसांची ही आक्रमक भूमिका कितपत परिणामकारक ठरते, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# एम.सी.पाटील यांचे निधन

। रसायनी । प्रतिनिधी ।

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ व निष्ठावंत नेते एम.सी. पाटील यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. तुर्भे येथे कामानिमित्त गेले असताना त्यांना अचानक



झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले. एम.सी. पाटील हे सहकारी भात गिरणीचे माजी चेअरमन तसेच विद्यमानसंचालकहोते.रायगडजिल्हा शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीस मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले होते. तसेच पनवेल एपीएमसी मार्केट यार्डमध्ये कांदा-बटाटा व्यापारी म्हणूनही ते परिचित होते. सोमटणे गावातील दानशूर आणि गोरगरिबांचे कैवारी म्हणून त्यांची ओळख होती. समाजकार्यात त्यांनी मोठे योगदान दिले असून, अनेक गरजूंना मदतीचा हात दिला होता.

# माजी विद्यार्थ्यांनी लुटला स्नेहमिलनाचा आनंद

। खरोशी । वार्ताहर ।

शैक्षणिक वर्ष १९८०-८१ या इयत्ता दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांनी सलग तीन वर्षे गेट टुगेदरचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. जय किसान विद्या मंदिर या माध्यमिक शाळेत वडखळ परिसरातील अनेक गावांमधून इयत्ता आठवीमध्ये प्रवेश घेतलेल्या १०८ विद्यार्थ्यांपैकी दहावीला ५२ विद्यार्थी गेले आणि ते यशस्वीरित्या पास होऊन, वेगवेगळ्या ठिकाणी आपल्या कामात मग्न झाले. ६० ते ६५ वर्षे वय असतानादेखील आज सर्वजण एकत्र येऊन श्रीक्षेत्रेश्वर मंदिर वडखळ या ठिकाणी सत्यनारायणाची महापूजा सर्वांच्या संमतीने घालण्यात आली. या पूजेचा मान पांडुरंग रामदास म्हात्रे व सौभाग्यवती मच्छगंधा पांडुरंग म्हात्रे यांना दिला होता. पूजेनंतर आरतीच्या माध्यमातून गणेश वंदना करण्यात आली. सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

विश्वनाथ शंकर म्हात्रे यांनी कार्यक्रमासाठी पुढाकार घेऊन त्यांना यशस्वी साथ देण्यासाठी अरविंद गजानन चव्हाण, डॉ. राजेंद्र पाटील, रघुनाथ पाटील, यशोदा, उषा, रेखा कुंदा व दमयंती आणि सुनील पाटील, सुनील गावंड, सुनील पाटील, सुनील म्हात्रे यांनी एकत्र येऊन हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहिली. सूत्रसंचालन रघुनाथ शांताराम पाटील यांनी केले. ४५ वर्षांच्या भेटीने अनेक मित्र-मैत्रिणी एकत्र आल्याने त्यांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. आपल्या शालेय जीवनातील गोड आठवणींना उजाळा देत मनमुरादपणे गळाभेट घेतली. शेवटी आलेल्या सर्वांचे शब्दसुमनाने आभार मानून हा स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले त्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.



**मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड**
**ई निविदा सुचना सन २०२६-२७**
**म्यु.जा.क्र. ०९/ई-निविदा/मु.न.प. २०२६-२०२७**

मा.प्रशासक तथा मुख्याधिकारी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड यांचेकडून १. मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील जंजीरकर गल्ली काँक्रीटीकरण करणे. २. मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील अग्निशम इमारत ते आदिवासीवाडी रोड तयार करणे. ३. मुरुड जंजिरा नगरपरिषद हद्दीतील बाऊल खलाटी रोड तयार करणे व गटार बांधकाम करणे. या कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल व अटी-शर्ती http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०६/०४/२०२६ पासून उपलब्ध असून निविदा भरण्याचा अंतिम दिनांक १५-०४-२०२६ आहे.
दिनांक :- ४/४/२०२६

सही/-
**मुख्याधिकारी**
**मुरुड जंजिरा नगरपरिषद**

पान १ वरून

## महसूल विभाग निद्रावस्थेत?

दरम्यान, बेकायदेशीर उत्खननावर कारवाई होत नसल्यामुळे महसूल विभागाच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. स्थानिक रहिवासी महेश जानू ठाकूर (रा. मिठागर, पो. सावली, ता. मुरुड-जंजिरा) यांनी १ एप्रिल २०२६ रोजी तहसीलदारांकडे याबाबत सविस्तर लेखी तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, मौजे उसडी येथील गट क्रमांक १७०, क्षेत्र ०-५०-९० हेक्टर या मिळकतीवर अस्लम इस्माईल कादरी (रा. दत्तवाडी, मुरुड) यांच्या नावावर सातबारा असून, कोणतीही शासकीय परवानगी न घेता येथे बेकायदेशीर दगड उत्खनन व स्टोन क्रशर सुरू आहे. महेश ठाकूर यांनी यापूर्वीही तक्रार करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप केला आहे. उलट, राजकीय दबावामुळे खाणमालकावर कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, याच प्रकरणात प्रशासनाने पूर्वी कारवाई करत सुमारे ६५ ते ६६ लाखांचा दंड ठोठावला होता, तसेच अंदाजे तीन कोटींची वाहने जप्त केली होती. याशिवाय, सरकारी गुरचरण जमिनीवरील अनधिकृत उत्खननप्रकरणी पोलिसांत गुन्हाही दाखल करण्यात आला होता. मात्र, न्यायालयीन प्रक्रिया सुरू असतानाच पुन्हा उत्खनन सुरू झाल्याने प्रशासनाच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. संबंधितांनी दंडाची रक्कम न भरता आणि कोणतीही अधिकृत परवानगी न घेता पुन्हा काम सुरू केल्यामुळे चिचघर, आगरदांडा आणि उसडी परिसरातील ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. जड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून, पर्यावरणीय हानीबरोबरच शेतीचेही नुकसान वाढले आहे.

महेश ठाकूर यांनी प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप करत, तातडीने कारवाई न झाल्यास उपोषण व तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. तसेच, अस्लम इस्माईल कादरी यांच्या मिळकतीवरील स्टोन क्रशरची तात्काळ पाहणी करून ते बंद करण्यात यावे, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, या तक्रारीची प्रत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच जिल्हाधिकारी, रायगड (खनिकर्म) यांच्याकडेही पाठविण्यात आली आहे. या प्रकरणामुळे उसडी, सावली, आगरदांडा व परिसरातील ग्रामस्थांमध्ये खळबळ उडाली असून, बेकायदेशीर खाणींमुळे होणाऱ्या पर्यावरणीय व आर्थिक नुकसानीविरोधात पुन्हा आवाज उठू लागला आहे. आता महसूल प्रशासन प्रत्यक्षात कारवाई करते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विवाहितेवर अत्याचार

अब्दुल रशीद उर्फ बाबाजान (रा. कळंबोली, नवी मुंबई) या स्वतःला जादूटोणा करणारा सांगणाऱ्या भोंदूबाबाकडे गेली.

या भोंदूबाबाने ''उपाय करून देतो'' असे सांगून प्रथम महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तिला माहेरी बोलावून घेऊन पुढे रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील महड येथे एका ठिकाणी नेण्यात आले. तिथे मध्यरात्री जादूटोण्याच्या नावाखाली विविध विधी करण्याचा बहाणा करत घराबाहेर काही वस्तू पुरण्यात आल्या. यानंतर अत्यंत विकृत प्रकार करत महिलेवर अत्याचार करण्यात आला. या प्रकारामुळे संबंधित महिला मानसिक धक्क्यात गेली. उपचाराच्या नावाखाली फसवणूक आणि अत्याचार झाल्याची जाणीव झाल्यानंतर पीडित महिलेने धैर्य दाखवत खालापूर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या सूचनेनुसार खालापूर पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. पोलीस निरीक्षक व त्यांच्या पथकाने कारवाई करत कळंबोली येथून आरोपी भोंदूबाबाला अटक केली असून, त्याला न्यायालयात हजर करण्यात आले आहे.

दरम्यान, राज्यात एकामागून एक अशा भोंदूबाबांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती आणि संताप व्यक्त केला जात आहे. अंधश्रद्धा आणि जादूटोण्याच्या नावाखाली महिलांवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग

हात धरून तिला बाहेर खेचण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या मुलीच्या कुटुंबियांनी जाब विचारण्यासाठी आरोपीच्या घरी गेल्यावर आरोपी व त्याच्या कुटुंबियांनी शिवीगाळ केली. याप्रकरणी पोक्सो कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे पालकांमध्ये मोठी चिंता व्यक्त होत आहे.

## चणेरा ग्रामस्थांचा संताप उफाळला

आता ग्रामस्थ आक्रमक झाले असून १४ एप्रिल रोजी चणेरा नाक्यावर रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येणार आहे. त्यानंतर सर्व आंदोलनकर्ते स्वतःला पोलिसांच्या स्वाधीन करून 'जेल भरो' आंदोलन करणार असल्याची माहिती प्रकाश विचारे यांनी दिली. तसेच, वारंवार खोटी आश्वासने देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई करून त्यांनाही अटक करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## स्पाच्या नावाखाली कुंटणखाना

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे व.पो.नि. पृथ्वीराज घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली गोल्डन किंग सलून आणि स्पामध्ये ३ एप्रिल रोजी दुपारी बनावट ग्राहक पाठवून खात्री करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी या ठिकाणी छापा मारला.

या कारवाई पोलिसांनी बनावट ग्राहकाकडून स्वीकारलेल्या ५०० रुपयांच्या नोटा, तीन महागडे मोबाईल जप्त केले. दरम्यान, पोलिसांनी केलेल्या चौकशीत समीर ऊर्फ अलीगोर अब्दुलहफिज अन्सारी (३३) व त्याची पत्नी परी ऊर्फ सलमा अलीगोर अन्सारी (२६) हे पती-पत्नी पीडित महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे तसेच त्यातून मिळणाऱ्या पैशांवर स्वतःची उपजीविका भागवत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने समीर परी या दोघांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे.

## लग्नाळू तरुणांना मुलगी मिळेना!

लागत आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या असून, त्या शहरात स्थायिक असलेल्या मुलांनाच प्राधान्य देत आहेत. ''मुलगा मुंबईत राहतो का?, स्वतःचा फ्लॅट आहे का?, चांगली नोकरी आणि गाडी आहे का?'' असे प्रश्न विचारल्यानंतरच पुढील बोलणी होत असल्याचे चित्र आहे. या अपेक्षांमध्ये बसत नसल्यास प्रस्ताव लगेच नाकारला जात आहे.

रायगड जिल्ह्यातील दुर्गम भागातील अनेक तरुण शेती, भाजीपाला उत्पादन किंवा इतर पारंपरिक व्यवसायात गुंतलेले आहेत. आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही केवळ शहरात वास्तव्य नसल्यामुळे त्यांना विवाहासाठी नकार मिळत असल्याचे समोर येत आहे.

परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, काही पालक आपल्या मुलांना काही काळासाठी शहरात खोली भाड्याने घेऊन राहण्यास पाठवत आहेत, जेणेकरून ''शहरात राहतो'' असे सांगून लग्न जुळवता येईल. वधूपक्षाकडून शहरात स्वतःचे घर किंवा स्थैर्य असलेल्या मुलालाच पसंती दिली जात असल्याचे दिसून येत आहे.

तज्ज्ञांच्या मते, शिक्षणाचा वाढलेला स्तर, शहरांचे आकर्षण आणि ग्रामीण भागातील सुविधांचा अभाव यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, गावी राहणाऱ्या आणि शेती व्यवसाय करणाऱ्या तरुणांना विवाहासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

गेल्या चार-पाच वर्षांपासून ही समस्या अधिक तीव्र झाली असून, एकेकाळी मुलींचे लग्न जुळवण्यासाठी वडिलांना धावपळ करावी लागत होती; मात्र आता चित्र उलटे झाले आहे. अनेक तरुणांचे वय ३० वर्षांपलीकडे गेले असून, तरीही त्यांचे लग्न जमत नसल्याची खंत पालक व्यक्त करत आहेत.

## पनवेलमध्ये ७०० चौरस फुटांपर्यंत करमाफीला ब्रेक

लागू करावी, अशी मागणी विरोधी पक्षाकडून करण्यात आली होती. विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेण्याची गरज व्यक्त केली.

मात्र, प्रशासनाने महसुलात घट होणे परवडणारे नसल्याचे सांगत हा प्रस्ताव फेटाळला. त्यामुळे ७०० चौ.फुटांपर्यंत करमाफीचा मुद्दा सध्या तरी थंडावल्याचे दिसत आहे.

## न्हावाशेवा पाणी योजना पुन्हा रखडली

एकूण ३९१ कोटींच्या या प्रकल्पात सिडको, जेएनपीटी, एमएमआरडीए आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचा सहभाग आहे. तरीही सहा वर्षांनंतरही योजना अपूर्णच आहे, ही बाब नागरिकांमध्ये नाराजी निर्माण करणारी ठरत आहे.

सध्या योजनेचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले असले तरी बांधकाम, यांत्रिक आणि विद्युत विभागांतील काही महत्त्वाची कामे बाकी आहेत. उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी पुन्हा एकदा मुदतवाढीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरू होण्यासाठी अजून किमान आठ महिने प्रतीक्षा करावी लागणार आहे.

दरम्यान, पनवेल शहरात झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि नव्या गृहनिर्माण प्रकल्पांमुळे पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. नावडे, तळोजे आणि खारघर परिसरात आधीच पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. सध्या पालिका क्षेत्रात सुमारे ३० एमएलडी पाण्याची कमतरता असून, ही तूट पुढील काही महिने नागरिकांना सहन करावी लागणार आहे.

योजनेच्या विलंबावरून विरोधकांनी सत्ताधारी आणि प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. दुसरीकडे आयुक्त मंगेश चितळे यांनी सभागृहात माहिती देताना काम पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात असल्याचे स्पष्ट केले.

एकीकडे ''८० टक्के काम पूर्ण'' अशी आकडेवारी दिली जात असताना, दुसरीकडे वारंवार होणाऱ्या मुदतवाढीमुळे पनवेलकरांचा संयम सुटू लागला आहे. पाणीपुरवठ्याच्या या महत्त्वाच्या योजनेची प्रतीक्षा आता आणखी एक वर्ष वाढल्याने ''पाणी कधी येणार?'' हा प्रश्न नागरिकांना सतावत आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र. हे आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| राहुल परेशभाई पटेल<br>आशा राहुल पटेल | ६३ | २ | ०-१३-४० | ९=०० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.
हे सर्वास कळावे.
ठिकाण :- नेरळ
दिनांक :- ६।४।२०२६

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट ब्लॉक नं- १०१ नेरळ
ता. कर्जत जि. रायगड मो. ९८८१२७९८१७

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे, किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळतीचे विद्यमान मानक जयश्री संतोष कोळी, दत्तागुरू लक्ष्मण कोळी व तुळशीराम लक्ष्मण कोळी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १) किहीम | ४०५ | ०-२५-८० | ०.६० |
| | | ०-०२-२० | |
| | | **०-२८-००** | |
| २) किहीम | ४०६ | ०-२६-९० | ०.६२ |
| | | ०-०२-३० | |
| | | **०-२९-२०** | |

तसेच त्यामध्ये असलेल्या ग्रुप ग्रामपंचायत किहीम मालमत्ता क्र.८५८, आणि ८८६ या इमारती.

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही,कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.
अलिबाग
तारीख : ६/४/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ओ/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

# यांचा जीव, त्यांचा जीव

अमेरिकेची दोन विमाने इराणने पाडली. त्यापैकी एकाचा एक वैमानिक बेपत्ता आहे. तो इराणच्या हद्दीतील डोंगराळ प्रदेशात कुठेतरी पडला असावा असा अंदाज आहे. एक तर तो पॅराशूटच्या साह्याने उतरला असावा किंवा खाली पडून जखमी झाला असावा असा अंदाज आहे. अमेरिकेने या एका वैमानिकाच्या शोधासाठी सगळे हवाई दल कामाला लावले आहे. अमेरिकेची हेलिकॉप्टर्स या भागात घिरट्या घालून पाहणी करीत आहेत. याच दरम्यान मदतीसाठी आलेल्या दोन हेलिकॉप्टर्सवरही इराणने हल्ला केला व त्यामुळे ती कशीबशी इतरत्र परत गेली. वैमानिक सापडणे हा अमेरिकेच्या प्रतिष्ठेचा विषय झाला आहे. तो जर इराणच्या हाती लागला तर अमेरिका युध्दात जणू हरली असे होईल. तब्बल ३५ दिवस इराणवर सतत बाँबहल्ले करूनही इराण जर का अमेरिकेचे अत्याधुनिक म्हणवले जाणारे विमान पाडू शकत असेल आणि त्याच्या वैमानिकाला कबजात घेऊ शकत असेल तर ते अमेरिकेसाठी लांच्छनास्पद आहे. या एका मुद्द्यावरून सर्व युध्द फिरू शकते. आधीच अमेरिकेत इराण युध्दावरून ट्रम्प यांच्या विरोधात वातावरण निर्माण झाले आहे. एरवी त्यांचे समर्थक असणारेही ट्रम्प यांना शिव्या घालत आहेत. यातला अपमानाचा भाग सोडा. पण अमेरिका आपल्या एकेका सैनिकाच्या जिवाची काळजी घेते. निदान तिथल्या सरकारला जनतेला तसे दाखवावे लागते. अमेरिकेची विमाने इतरत्र हल्ले करून हजारो माणसे किड्यामुंग्यांसारखी मारू शकते. इराणमध्ये गेल्या महिनाभरात साडेतीन हजार लोक मेले आहेत. त्यातले १६०७ साधे नागरिक आहेत. बाकीचे सैनिक किंवा सरकारी अधिकारी इत्यादी आहेत. सामान्य नागरिकांमध्ये मिनाबमधली १६० निष्पाप मुलेही आहेत. त्यांच्या शाळेवर इस्रायलने क्षेपणास्त्र टाकले होते. त्याबद्दल आजतागायत अमेरिका किंवा इस्रायलने माफीदेखील मागितलेली नाही. इराणमध्ये युध्दात २६ हजार लोक जखमी झाले आहेत. यातले बहुतांश सैनिक नसलेले लोक आहेत. यांच्या जिवाला अमेरिकी सरकार किंवा अमेरिकेचे लोक यांच्या लेखी काहीही किंमत नाही. पण त्यांचा एक वैमानिक मेला किंवा इराणमध्ये जखमी झाला तर तो मात्र त्यांच्यासाठी मोठा हादरा असणार आहे.

## गाझात ७५ हजार मेले

यापूर्वी गाझामध्ये इस्रायलने जवळपास ७५ हजार पॅलेस्टिनींना ठार मारले. अजूनही तो लेबनॉन व गाझामध्ये हल्ले करीत आहे. ७५ हजार म्हणजे पॅलेस्टिनींच्या एकूण लोकसंख्येच्या तीन टक्के होतात. इतके लोक मारूनही त्याबद्दल कोणीही इस्रायलला दोष देत नाही. इस्रायलला युद्ध गुन्हेगार ठरवून त्याच्याविरुध्द आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला दाखल केलेल्या दक्षिण आफ्रिकेला ट्रम्प यांनी काळ्या यादीत टाकले. असे हे निव्वळ कत्तलखोर लोक आहेत. पूर्वी भारतात अनेकदा बाँबस्फोट झाले व शेकडो लोक मारले गेले. त्यात पाकिस्तानात काम करीत असलेल्या दहशतवाद्यांचा हात होता हे दिसत होते. पण अमेरिकेने पाकिस्तानला चालू असलेली मदत कधीही थांबवली नाही. मात्र कसाबच्या २६ नोव्हेंबरच्या मुंबई हल्ल्यात अमेरिकी नागरिक मारला गेल्यावर हे एकदम चवताळून उठले. यांनी पाकिस्तानची नाकेबंदी करायला सुरुवात केली. आता आपल्या वैमानिकाच्या सुटकेसाठी हे आकाशपाताळ एक करतील. त्यासाठी हजारो इराणी लोकांचे जीव गेले तरी त्यांना पर्वा नसेल. या पार्श्वभूमीवर भारतासारख्या देशांकडे पाहिले तर अतिशय भीषण स्थिती दिसते. अमेरिका पहिल्या जगातला देश का आहे आणि आपण तिसऱ्या जगातले का याचा खुलासा त्यातून होतो. भारताच्या सीमेवर आणि आतमध्ये सर्रास आपले जवान मारले जातात. पण सरकार त्याविषयी बेदरकार असते. काश्मीरमध्ये पुलवामामध्ये सैनिकांना घेऊन जाणाऱ्या ताफ्यावर गाड्या आदळवून बाँबस्फोट झाले. त्यात अनेक जवान मारले गेले. या जवानांना संरक्षण दलाचे विमान का दिले गेले नव्हते, रस्ते मार्गाने का प्रवास करावा लागला याचा खुलासा आजतागायत झालेला नाही. गेल्या वर्षी पुलवामामध्ये माणसे मेली. तिथल्या सुरक्षा यंत्रणा काढून का काढून घेतल्या होत्या याचे काहीही स्पष्टीकरण मिळालेले नाही. पुलवामाचा हल्ला करणारे नंतर कित्येक दिवस भारतातच होते. पण आपल्या पोलिसांना मिळत नव्हते. शेवटी संसदेत ज्या दिवशी चर्चा झाली नेमके त्याच दिवशी चकमकीत त्यांना मारले गेले. निदान तसे सांगितले गेले. त्यांना दारुगोळा व इतर मदत कोठून येत होती याचा स्पष्ट खुलासा झालेला नाही.

## गलवानमध्ये २० हुतात्मा

माणसे, सैनिक यांच्या जिवांची काहीही किंमत नसणे हा तिसऱ्या जगाचा खास शाप आहे. कालपरवा नाशिक जिल्ह्यात दिंडोरी मोटार विहिरीत पडून नऊ जण मेले. ही विहीर भर रस्त्यातच होती व रात्रीच्या वेळीच नव्हे तर दिवसाही सहज लक्षात येऊ नये अशी होती. आता ती बुजवण्यात येणार आहे. पण इतके दिवसात ती का तशीच राहू दिली गेली याचे काही उत्तर नाही. अशा अनेक विहिरी, धोकादायक रस्ते, इमारती राहू दिल्या जातात. अपघात झाला की मग त्या हटवल्या जातात. भारतात लोकसंख्याच इतकी आहे की, माणसांचा जीव जाणे याला फार किंमत नाही. पण आपण आपल्या सैनिकांच्या बाबतही तितकेच बेदरकार असतो. २०२० मध्ये गलवान खोऱ्यामध्ये चीनच्या सीमेवर भारत आणि चीनच्या जवानांमध्ये अनेकदा चकमकी झाल्या. १५ जूनला झालेल्या चकमकीत भारताचे २० जवान मारले गेले व ७६ जण जखमी झाले. या प्रसंगाची माहिती भारतीय लष्कराने वा सरकारने दिली नव्हती. ती टीव्ही वाहिन्या व इतर माध्यमांमधून बाहेर फुटली व हळूहळू तपशील बाहेर आले. एरवी पाकिस्तानबरोबर चकमकीत मारल्या गेलेल्या जवानांचे अंत्यसंस्कार मोठा गाजावाजा करून त्यांच्या गावात केले जातात. त्यामागे उघडच राजकारण असते. पण चीनच्या सीमेवर मारल्या गेलेल्या सैनिकांना असे भाग्य लाभले नाही. आज इराणच्या युध्दात अमेरिकेचे १३ जवान मारले गेले आहेत. पण त्यावरूनही अमेरिकेत प्रचंड असंतोष आहे. याउलट एका चकमकीत भारताचे वीस किंवा काही लोकांच्या म्हणण्यानुसार ३० जवान मारले जातात आणि त्याबाबत भारतात काहीही प्रतिक्रिया उमटत नाही हे उल्लेखनीय आहे. याबाबत सरकारला धारेवर धरले जात नाही की असंतोषही व्यक्त केला जात नाही. उलट मोदी सरकार चीनला कसे नमवत आहे याच्या खोट्या व फालतू कथा प्रसृत केल्या जातात. अर्थात हे पूर्वापार होत आलेले आहे. चीन, पाकिस्तान यांच्यासोबतच्या संघर्षात तसेच कारगील युध्दांमध्येही आपले अनेक जवान मारले गेले आहेत. अमेरिका किंवा इंग्लंड यांना कोणत्याही शत्रू देशाची सीमा लागून नाही. त्यामुळे त्यांना अशा सतत चकमकी सहन कराव्या लागत नाहीत हे खरे आहे. पण सामान्य माणसे किंवा जवान यांच्या जिवाला तिथे भयंकर महत्व दिले जाते व एकही बळी गेला तर त्याबद्दल संवेदना व्यक्त केली जाते हेही तितकेच खरे. अर्थात, हे सर्व आपल्या नागरिकांबद्दल असते. दुसऱ्या देशाची व त्यातही गरीब देशांची कितीही माणसे अमेरिका व इंग्लंडने मारली तरी तिथल्या नागरिकांना काहीही पडलेले नसते ही या मुद्द्याची दुसरी बाजू आहे.

विचार

# मोजूनी माराव्या पैजारा!

**बाबा-बुवांच्या माध्यमातून महिलांच्या शोषणाच्या कहाण्या नव्या नाहीत. अशा दुर्दैवी घटनांचा खोलवर तपास झाल्यास काय घडू शकते याचा वस्तुपाठ अशोक खरात यांच्या डोके चक्रावून टाकणाऱ्या भयावह भोंदूगिरीच्या निमित्ताने समोर आला. यंत्रणा या प्रकरणाच्या तळाशी गेल्या आणि भयानक वास्तव जगासमोर आले. अशा काही प्रकरणांच्या निमित्ताने सडक्या मनोवृत्तीच्या शोषणकथा विचारी मनाला आव्हान देत आहेत.**



मधुरा कुलकर्णी

गेल्या काही दिवसांमध्ये बाबा-बुवांच्या माध्यमातून महिलांच्या शोषणाच्या अनेक कहाण्या पुन्हा एकवार समोर आल्या. त्याबाबत महिलांना किंवा ठराविक लोकांच्या अंधश्रद्धेला दोष देऊन अनेकजण मोकळे झाले, पण अशा दुर्दैवी कहाण्यांच्या मुळाशी जाऊन तपास करण्याचे प्रयत्न फारसे झाले नव्हते. मात्र असे प्रयत्न झाल्यास काय घडू शकते याचा वस्तुपाठ अशोक खरात यांच्या डोके चक्रावून टाकणाऱ्या भयावह भोंदूगिरीच्या निमित्ताने पहायला मिळाला. यंत्रणा या प्रकरणाच्या तळाशी गेल्या आणि एक भयानक वास्तव जगासमोर आले. या आणि अशा इतर प्रकरणांच्या निमित्ताने एव्हाना सडक्या मनोवृत्तीच्या काही शोषणकथा चर्चेत आल्या आहेत. आधुनिक माध्यमांच्या प्रसारामुळे 'महाराज' किंवा 'बाबा' यांची प्रतिमा मोठ्या प्रमाणावर उभी केली जाते. सोशल मीडिया, टीव्ही चॅनेल्स आणि मोठ्या प्रमाणावर होणारे धार्मिक कार्यक्रम यामुळे या व्यक्तींना प्रचंड लोकप्रियता मिळते; पण या लोकप्रियतेच्या आड अनेकदा अनैतिक कृत्ये लपलेली असतात. महिलांवर अत्याचार, आर्थिक फसवणूक, मानसिक शोषण यासारखे गंभीर आरोप समोर येत आहेत. काही प्रकरणांमध्ये न्यायालयांनी दोष सिद्धही केले आहेत, जे अत्यंत धक्कादायक आहे. महिलांच्या संदर्भात ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. मनःशांती, समाधान, आध्यात्मिक आधार शोधण्याच्या प्रयत्नात अनेक महिला अशा कथित गुरूंच्या संपर्कात येतात. भावनिक, मानसिक किंवा कौटुंबिक अडचणींमुळे त्या अशा गुरुंवर सहज विश्वास ठेवतात; पण या विश्वासाचा गैरफायदा घेतला जातो. 'आशीर्वाद', 'उपचार', 'साधना' अशा नावाखाली त्यांचे शोषण केले जाते. ही समाजाच्या नैतिक अधःपतनाची लक्षणे आहेत.

अनेक कथित महाराजांना स्थानिक तसेच राज्यस्तरीय नेत्यांचा पाठिंबा मिळतो. त्यांच्या कार्यक्रमांना राजकीय उपस्थिती असते, निधी उपलब्ध करून दिला जातो आणि त्यांच्या विरोधातील तक्रारींकडे दुर्लक्ष केले जाते. यामुळे अशा व्यक्तींचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांचे गैरप्रकार अधिक बिनधोक सुरू राहतात. धर्म आणि राजकारण यांचे हे अयोग्य मिश्रण समाजासाठी घातक ठरते. बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांच्या संदर्भात दोष सिद्ध होण्याचे प्रमाण कमी असल्याचेही दिसून येते. यामागे अनेक कारणे आहेत. पीडितेवर येणारा सामाजिक दबाव, पुराव्यांचा अभाव, दीर्घकालीन न्यायप्रक्रिया आणि प्रभावशाली आरोपींचा दबाव यामुळे अनेक महिला तक्रार दाखल करण्यासही घाबरतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी अधिक कडक आणि संवेदनशील असणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर समाजाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. वारकरी संप्रदायाचा खरा वारसा म्हणजे विवेक, समता आणि नैतिकता. कीर्तन ही परंपरेने प्रबोधनाची साधना होती. कीर्तनकार हा केवळ धार्मिक कथाकार नसून समाजाचा मार्गदर्शक मानला जात असे; परंतु आज काही ठिकाणी कीर्तन ही साधना न राहता एक 'व्यवसाय' बनली आहे. प्रसिद्धी, पैसा आणि राजकीय आश्रय यासाठी काहीजण या माध्यमाचा गैरवापर करताना दिसतात. अशा परिस्थितीत कीर्तनाचा मूळ उद्देश हरवून बसतो आणि श्रोत्यांची दिशाभूल होते.

कोणत्याही व्यक्तीला 'देव' मानणे, त्याच्यावर अंधविश्वास ठेवणे वस्तुतः वारकरी परंपरेच्या विरोधात आहे. शिक्षण आणि जागृती हा यावरील सर्वात प्रभावी उपाय आहे. समाजातील प्रत्येक घटकाने, विशेषतः महिलांनी, स्वतःच्या अधिकारांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. कोणत्याही आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी जाताना विवेकबुद्धी वापरणे, प्रश्न विचारणे आणि शंका उपस्थित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच माध्यमांनीही जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. केवळ प्रसिद्धीच्या मोहापायी अशा व्यक्तींना प्रोत्साहन देणे टाळले पाहिजे. सरकार आणि प्रशासनाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. अशा प्रकरणांमध्ये तात्काळ आणि निष्पक्ष चौकशी होणे, दोषींवर कठोर कारवाई करणे आणि पीडितांना संरक्षण आणि न्याय मिळवून देणे ही त्यांची जबाबदारी आहे. तसेच धार्मिक संस्थांच्या कार्यपद्धतीवर काही प्रमाणात नियंत्रण ठेवणे, पारदर्शकता वाढवणे आणि जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. वारकरी संप्रदायाची खरी ओळख पुन्हा प्रस्थापित करणे ही काळाची गरज आहे. संतांच्या शिकवणीचा अर्थ केवळ भजन-कीर्तनात नाही, तर दैनंदिन जीवनात नैतिकता, प्रामाणिकपणा आणि सहिष्णुता यांचा अवलंब करण्यात आहे. समाजाने या मूळ मूल्यांकडे परत जाणे आवश्यक आहे. अन्यथा, आध्यात्मिकतेच्या नावाखाली सुरू असलेली ही अधोगती पुढील पिढ्यांसाठी घातक ठरेल.

अंधश्रद्धा आणि व्यक्तिपूजेपासून दूर राहून विवेक आणि सत्याचा मार्ग स्वीकारण्याची आज गरज आहे. वारकरी परंपरेचा खरा वारसा जपायचा असेल, तर 'मद, मोह, मत्सर' यांच्यापासून दूर राहण्याबरोबरच 'अज्ञान, भीती आणि अंधविश्वास' यांच्याशीही लढा देणे आवश्यक आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा ही महाराष्ट्राच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा कणा मानली जाते. 'मद, मोह, मत्सर यांपासून दूर राहणे' हा वारकरी तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. साधेपणा, समता, नामस्मरण आणि सामूहिकतेतून व्यक्त होणारे अध्यात्म हे या परंपरेचे वैशिष्ट्य आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यासारख्या संतांनी या परंपरेला प्रबोधनाची धार दिली. त्यांच्या अभंगांमधून आणि कीर्तनातून समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, अन्याय यावर प्रखर प्रहार झाला. म्हणूनच वारकरी परंपरा ही केवळ धार्मिक चळवळ नसून सामाजिक परिवर्तनाची एक मोठी लाट होती; परंतु आजच्या काळात या परंपरेच्या नावाखाली काही विकृत प्रवृत्ती डोके वर काढताना दिसतात. वारकरी संप्रदायाचा मूळ संदेश जिथे आत्मसंयम, विवेक आणि नैतिकता यांवर आधारलेला आहे, तिथे काही कथित कीर्तनकार आणि तथाकथित 'महाराज' भोगवृत्ती, सत्तेची लालसा आणि व्यक्तिपूजेला खतपाणी घालताना दिसतात. गेल्या काही वर्षांमध्ये देशभरात घडलेली प्रकरणे पाहिली, की स्वतःला संत, महंत म्हणाऱ्यांचे पाय मातीचे असल्याचे दिसते. आसाराम बापूसह अनेकांवर बलात्काराचे गुन्हे दाखल झाले. कुंटणखाने चालवल्याच्या थाटात आश्रम चालवण्याचे प्रकार दिसले. त्याग वृत्तीऐवजी भोगवृत्ती आणि विलासी वृत्ती फोफावली.

बरेचदा भक्त परिवार धूर्त बाबांच्या प्रेमात इतका आंधळा झालेला असतो, की बलात्काराचे गुन्हे दाखल झाल्यानंतरही भक्त आरत्या ओवाळण्याचे कमी करत नव्हते. आसारामबापूला शिक्षा सुनावल्यानंतरही त्याचे समर्थक शाळांमधून त्यांच्या छायाचित्रांच्या आणि काही कथित शिकवणुकीच्या वह्या वाटत होते. अलिकडच्या काळात महाराष्ट्रासह देशभरात उघडकीस येणाऱ्या काही घटनांनी समाजमन हादरवून सोडले आहे. अध्यात्म, साधना, कीर्तन, प्रवचन या पवित्र संकल्पनांच्या आड लपून काही कथित 'महाराज' आणि 'बाबा' यांनी उभारलेले साम्राज्य आर्थिकच नाही, तर नैतिक अधःपतनाचेही प्रतीक बनले आहे. नाशिक जिल्ह्यातील अशोक खरात याच्याविरोधात महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचे आरोप, नगर जिल्ह्यातील यशवंत एकनाथ थोरात उर्फ गुंजाळ महाराजावर अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्यामुळे दाखल झालेला गुन्हा आणि या सर्वांमध्ये कथित राजकीय-सामाजिक आश्रयाची चर्चा या सगळ्यांनी एक गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे, तो म्हणजे आपण नेमके कुठे चाललो आहोत? खरातने आध्यात्मिक मार्गदर्शनाच्या नावाखाली महिलांशी गैरवर्तन केल्याचे आरोप व्हिडिओसह पुढे आले. विशेष म्हणजे, त्याच्या ट्रस्टमधील काही विश्वस्त आणि प्रभावशाली व्यक्तींशी असलेल्या त्याच्या कथित संबंधांमुळे या प्रकरणाने अधिकच वादळी स्वरूप धारण केले. या संदर्भात काही राजकीय नावेही समोर आली. खरातचे सर्वपक्षीय राजकारण्यांशी संबंध होते. त्याच्याकडे सापडलेल्या व्हिडीओंमुळे किती महिलांवर अत्याचार झाले, यावर आता प्रकाश पडेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत घेतलेली भूमिका स्वागतार्ह आहे. तेजस्विनी सातपुते यांच्या अध्यक्षतेखालील विशेष तपास पथक आता त्याचा तपास करत आहे, मात्र अशा प्रकरणांमागे दडलेल्या अंधश्रद्ध वृत्तींचा गांभिर्याने विचार झाला पाहिजे.

चर्चा आजची

# रस्ते दुरुस्ती अजून किती बळी घेणार?



वैष्णवी वाडकर

अलिबागसह मुरूड तालुक्यात गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून रस्ते रुंदीकरण आणि गटारांच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरु आहे. त्यामुळे तालुका विकसित होत असताना नागरिक आनंदी असून, त्याप्रमाणे सहकार्य देखील करत आहेत. परंतु, ही विकास कामे होत असताना संबंधित प्रशासनाच्या नियोजनशून्य कामामुळे नागरिकांच्या आनंदावर विरजण पडले आहे. तालुक्यातील रस्ते दुरूस्तीदरम्यान आत्तापर्यंत दोन अपघात घडले आहेत. या अपघातांमध्ये एका व्यक्तीने आपला जीव गमावला असून दुसरी व्यक्ती गंभीर जखमी झाल्याने आयसीयूमध्ये आहे. त्यामुळे या घटना अतिशय संतापजनक आहेत. वारंवार या विकासकामांदरम्यान होणारे अपघात व प्रचंड अडचणी निर्माण होत असल्यामुळे प्रवासी वर्गात प्रचंड नाराजी पसरलेली आहेत. त्यामुळे ही जीवघेणी रस्तेदुरुस्ती ठरत अजून किती बळी घेणार? अशी चर्चा प्रवासी वर्गासह स्थानिकांमधून होत आहे.

एमएसआयडीसीमार्फत अलिबागसह मुरूड तालुक्यात रस्ता रुंदीकरण व गटारीच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरु आहे. गटारीच्या काँक्रिटीकरणाचे काम नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान सुरु करण्यात आले. परंतु, अद्याप ते काम पूर्ण झालेले नाही. नोव्हेंबर-डिसेंबरचा कालावधी तालुक्याच्या पर्यटनासाठी महत्वाचा मानला जातो. असंख्य पर्यटक नाताळ व नवीन वर्ष साजरे करण्यासाठी तालुक्यात दाखल होतात. याच कालावधीत अलिबाग- चौल मार्गावर गटाराच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरु झाल्याने पर्यटकांसह स्थानिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवण्यात आले. त्यामुळे दुहेरी मार्गावर एकेरी वाहतूक वळवण्याची वेळ आली. यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी व्हायला सुरुवात झाली. अजूनही अनेक ठिकाणी काँक्रिटीकरणाचे काम सुरू असून खोदकाम करताना बेलकडे येथील पाईप लाईन फुटल्या गेल्या. त्यामुळे या मार्गांवरील गावात पाणीपुरवठा बंद झाला. भर उन्हाळ्यात नागरिकांवर पाणी टंचाईचे संकट ओढवले. स्त्रियांसह, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. दरम्यान, या कामाचा फटका दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना बसला. ऐन परीक्षा व पर्यटनाचा हंगामात रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु असल्याने तालुक्यात वारंवार अतिशय मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. दहावी, बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेचा वेळेस देखील अशीच वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. बेलकडे ते अगदी कुरुळीपर्यंत चारचाकीसह दुचाकीच्या रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीत एसटी बसेस देखील अडकून पडल्या होत्या. शेवटी विद्यार्थ्यांवर पायी परीक्षा केंद्रांवर पोहोचण्याची वेळ आली. या सर्व प्रकरणानंतर विद्यार्थ्यांसह पालकांनी प्रचंड संताप व्यक्त करण्यात आला आहे. तसेच, अलिबाग वनविभागात कार्यरत असलेले सुरज सारंगे यांनी प्रशासनाच्या नियोजनशून्य कामामुळे आपला जीव गमावला आहे. मार्च महिन्यात नुकतीच जुळी मुले झालेले सूरज मुलांच्या बारशाचे आमंत्रण देऊन घरी जात असताना अलिबाग-मुरूड रस्त्यावर खोदुन ठेवलेल्या मोरीत पडून त्यांचा दुर्दैवी अंत झाला. त्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने कोणत्याही उपाययोजना करण्यात आल्या नव्हत्या. त्या ठिकाणी रेडियम पट्टी, दिशादर्शक व सूचनाफलक किंवा बॅरिकेट्स नव्हते, म्हणून हा जीवघेणा अपघात घडला. या घटनेला महिना होत नाही तोच आणखी एक अशीच घटना समोर आली आहे. अलिबाग तालुक्यातील चौल-वावे मार्गावर देखील रस्त्याचे काम सुरू आहे. या मार्गावरील बीबी गावाजवळ मोरीसाठी खोल खड्डा खणण्यात आला आहे. या खड्ड्यात रात्रीच्या सुमारास सागवाडी येथील रामनाथ जगन्नाथ फसाळा (३०) हे त्यांच्या दुचाकीसह कोसळले. या अपघातात त्यांच्या शरीरात लोखंडी रॉड घुसल्याने हनुवटी, ओठ, कपाळ, नाक व तोंडावर गंभीर दुखापती झाल्या असून त्यांच्यावर सध्या अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत.त्यामुळे तालुक्यात विकासाच्या नावाखाली चालणाऱ्या रस्त्याच्या कामांमुळे नागरिकांवर असलेला ताण आता अती होत आहे. अपघात, वाहतूक कोंडी, पाणीटंचाई अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. फक्त रस्ते रुंदीकरण करून दाखवणे पुरेसे नाही. तर तो रस्ता सुरक्षित आणि नागरिकांसाठी उपयुक्त असणे आवश्यक आहे. तालुक्याचा विकास हा स्थानिक नागरिकांच्या जीवनासाठी अत्यंत महत्वाचा आहे. परंतु, या कामांत नागरिकांचा बळी जात असेल तर हा विकास काय कामाचा? असा प्रश्न सर्व सामान्य जनतेमधून उपस्थित केला जात आहे. या घटनांमधून स्पष्ट होते की, प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. विकासाच्या नावाखाली वाहतूक कोंडी, पाणीटंचाई आणि जीवघेणे अपघात या वाढत्या घटनांमुळे नागरिकांचा संताप वाढत आहे. त्यामुळे प्रशासनाने त्वरित यावर उपाययोजना करेल, तसेच खोदकाम पूर्ण झालेल्या मार्गांना सुरक्षित बनवेल आणि नागरिकांच्या जीवनाचा आदर करेल, अशी अपेक्षा सर्व सामान्य नागरिकांना होती. परंतु, या रस्तेदुरूस्तीसाठी अजुन किती बळी घेणार, असा संतप्त सवाल संबंधित प्रशासनाला विचारण्याची नामुष्की सर्वसामान्य नागरिकांवर आली आहे.

लोकसंसद

## अतिउष्णतेचा भारताला अधिक धोका

जागतिक पातळीवरील 'द लॅन्सेट ग्लोबल हेल्थ' या वैद्यकीय नियतकालिकात प्रकाशित करण्यात आलेल्या २०२६ च्या अभ्यास अहवालातील निष्कर्षानुसार जागतिक हवामान बदलामुळे वाढणाऱ्या तापमानामुळे जगभरात आरोग्याची समस्या अत्यंत उग्र होऊन लोकांच्या कार्यक्षमेतवर परिणाम होईल. परिणामी २०५० पर्यंत दरवर्षी जगभरात साधारणपणे ७ लाख अकाली मृत्यू होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या अभ्यासातील प्रमुख निष्कर्षानुसार वाढत्या तापमानामुळे लोकांची हालचाल कमी होऊन शारीरिक हालचाली घटतात. त्यामुळे हृदयविकार, मधुमेह आणि कर्करोगाचा धोका वाढत जातो. या अभ्यासात असेही आढळून आले की सरासरी तापमान २७.८ डिग्री सेल्सियस पेक्षा जास्त झाल्यास जागतिक स्तरावर शारीरिक निष्क्रियतेमध्ये १.५ टक्के गुणांची वाढ होते. लोकांच्या शारीरिक निष्क्रियतेमुळे उत्पादकतेमध्ये वार्षिक २.४० ते ३.६८ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे नुकसान होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आपल्या भारतासारख्या उष्णकटिबंधीय आणि विकसनशील प्रदेशांमध्ये या परिणामाची तीव्रता अधिक असेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. २०५० पर्यंत भारतात दर एक लाख लोकसंख्येमागे दहाहून अधिक मृत्यू केवळ उष्णतेमुळे निर्माण झालेल्या शारीरिक निष्क्रियतेमुळे होऊ शकतात. या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे की ७ लाख मृत्यूंचा हा अंदाजित आकडा अति उष्णतेमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्यामुळे होणाऱ्या मृत्यूंशी संबंधित असून उष्माघात किंवा उष्णतेमुळे होणाऱ्या मृत्यूंचा यात समावेश नाही. यावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करणे आणि हरितगृह वायूचे उत्सर्जन वेगाने कमी करणे अशा उपाययोजना करण्याची गरज आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# दांडीयात्रेनंतर गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह

'अहिंसा शूरवीरांसाठी आहे, भ्याडांसाठी कधीही नाही,' असे महात्मा गांधी म्हणाले होते. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यादरम्यान, महात्मा गांधींचे मभारत छोडोफ आंदोलन किंवा प्रसिद्ध मिठाचा सत्याग्रह, हे सर्व अहिंसेवर आधारित होते. दांडी यात्रा नंतर महात्मा गांधी यांनी सुरू केलेला मिठाचा सत्याग्रह हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा होता. १९३० साली ब्रिटिश सरकारने मिठावर कर लावला होता. हा कर सामान्य लोकांसाठी अन्यायकारक होता, कारण मीठ ही प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक वस्तू आहे. त्यामुळे गांधीजींनी या अन्यायाविरुद्ध शांततामय पद्धतीने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. १२ मार्च १९३० रोजी गांधीजींनी साबरमती आश्रमातून दांडीकडे पायी यात्रा सुरू केली. सुमारे २४० मैलांचा हा प्रवास २४ दिवसांत पूर्ण झाला. ६ एप्रिल १९३० रोजी गांधीजी दांडी येथे पोहोचले आणि समुद्राच्या पाण्यातून मीठ तयार करून ब्रिटिश कायद्याचे उल्लंघन केले. ६ एप्रिलच्या पहाटे नेहमीची प्रार्थनासभा आटोपल्यानंतर गांधीजी व अनुयायी समुद्रकिनाऱ्याकडे चालत गेले. सकाळी ८.३० वा. तयार झालेले मूठभर मीठ उचलले आणि तेथे मिठाचा कायदा भंग केला. या घटनेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिले होते. अनेक परदेशी पत्रकार/प्रतिनिधी हे अलौकिक दृश्य पाहण्यासाठी हजर होते. या घटनेने राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासात सर्वप्रथम अहिंसात्मक कायदेभंगाचा समारंभ साजरा झाला. कायदेभंग करणाऱ्या या साध्या सांकेतिक घटनेनंतर परकीय सरकारच्या कायद्यांना आव्हान देण्याची हिंमत भारतीय लोकांत संचारली. अन्यायकारक कायदे मोडण्यासाठी आणि स्वत:ला अटक करून घेण्यासाठी समाजातील विविध स्तरातील लाखो लोकांनी सर्वत्र आंदोलने सुरू केली. साऱ्या देशात प्रभातफेऱ्या, मिरवणुका, झेंडावंदन, चरखे व सूतकताई इत्यादींमुळे उत्साह व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.

गांधीजींच्या अटकेनंतर देशभर वणवा पेटल्यासारखेच झाले. दांडी यात्रेच्या धर्तीवर कित्येक ठिकाणी समुद्र किनाऱ्यापर्यंत सत्याग्रही मोर्चे गेले. परदेशी कापडाची होळी, दारूच्या दुकानांसमोर निदर्शने, जंगल सत्याग्रह, मुंबई आणि सोलापूरला हरताळ आणि कामगारांचे संप हे या आंदोलनाचे स्वरूप झाले. या सत्याग्रहाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सरहद्द गांधी आणि महत्त्वाच्या राष्ट्रीय मुसलमान नेत्यांनी हजारो मुसलमानांना स्वातंत्र्यआंदोलनात आणले. २३ एप्रिल रोजी खान अब्दुल गफारखान यांच्या नेतृत्वाखालील खुदाई खिदमतगार व नवजवान सभा या संघटनांच्या नेत्यांची धरपकड झाल्यानंतर संबंध पेशावर ब्रिटिश सरकारविरुद्ध उभे राहिले. त्या वेळी गढवाली सैनिकांनी गोळीबाराचा हुकूम न जुमानता निःशस्त्र जमावावर गोळीबार करण्याचे नाकारले. त्यामुळे भयभीत होऊन सारी सरकारी यंत्रणाच कोलमडली. पुढील १० दिवसांत पेशावरला ब्रिटिश शासनयंत्रणा अस्तित्वातच नव्हती. ४ मे रोजी नवीन सैन्यदले आणून पेशावर पुन्हा जिंकून घेण्यात आले. १० मे पासून सरदार वल्लभभाई पटेलांनी बार्डोलीहून साराबंदी आंदोलन सुरू केले. हे आंदोलन गुजरातप्रमाणे बिहारमध्येही पसरले. खेड्याखेड्यांतून सर्व सरकारी सेवकांनी राजीनामे दिले. ब्रिटिश कापडावर बहिष्कार घालण्याचा कार्यक्रम तर एवढा यशस्वी झाला की, एकट्या ब्लॅकबर्न या ब्रिटिश शहरातल्या १०० कापड गिरण्या बंद पडल्या. तत्कालीन मध्य प्रांतात मोठ्या प्रमाणावर जंगल सत्याग्रह झाला. बंगालच्या संथाळ या आदिवासी जमातीने बालाघाट जिल्ह्यात यशस्वी साराबंदी आंदोलन केले. फेब्रुवारी १९३१ पर्यंत ९० हजारांवर सत्याग्रहींना शिक्षा झाल्या होत्या. देशातल्या बहुतेक शहरांतही लाठीहल्ला आणि गोळीबाराच्या घटना घडल्या.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ एप्रिल

१) श्रीम. सीताबाई रामचंद्र थळे सारळ, अलिबाग, ६-४-१९४५
२) श्रीम. सुनिता पांडुरंग पाटील सारळ, अलिबाग, ६-४-१९४४
३) श्रीम. माधवी महादेव पाटील बोरीस, ६-४-१९५५

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# पेणची विद्वत्ता आणि कलंकाची सावली




**संतोष पाटील**

कोकणातील 'पुणे' म्हणून ओळखले जाणारे पेण हे शहर प्राचीन काळापासून विद्वत्तेचे केंद्र राहिले आहे. पेणच्या पंडितांनी आपल्या ज्ञानाच्या बळावर आदि शंकराचार्य यांसारख्या विद्वानांनाही पराभूत केल्याच्या कथा इतिहासात सांगितल्या जातात. गणेशमूर्ती निर्मितीच्या कलेमुळे पेणला जागतिक ओळख मिळाली आहे. हजारो कारागीर या कलेतून आपला उदरनिर्वाह करतात आणि पेणचे नाव देशोदेशी पोहोचवतात.

मात्र, २३ मार्च २०२६ रोजी घडलेली एक घटना या गौरवशाली परंपरेवर काळी छाया टाकणारी ठरली. पेण-बोरगाव हद्दीतील एका सेलिब्रेशन रिसॉर्टवर पोलिसांनी टाकलेल्या धाडीत वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे उघड झाले. तीन महिलांना तेथे सापडून त्यांच्याकडून बळजबरीने हा व्यवसाय करून घेतला जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली. चार आरोपींना अटक झाली, तर आणखी काही आरोपी अद्याप फरार आहेत.

ही घटना केवळ गुन्हेगारी नाही, तर समाजाच्या नैतिक अधःपतनाचेही लक्षण आहे. विशेष म्हणजे, २००९ पासून सुरू असलेल्या या रिसॉर्टवर ग्रामपंचायतीने व्यावसायिक कर न लावता घरगुती कर आकारला असल्याचे उघड झाले आहे. यामुळे स्थानिक प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इतक्या वर्षांपासून चालणारा हा गैरप्रकार प्रशासनाच्या नजरेतून कसा सुटला? की जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले? याहूनही गंभीर बाब म्हणजे, या घटनेनंतर महिलांच्या संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या संघटना पूर्णपणे गप्प आहेत. महिलांच्या हक्कांबद्दल आणि सुरक्षिततेबद्दल मोठमोठ्या घोषणा करणाऱ्या या संघटना या प्रकरणात मात्र पुढे येताना दिसत नाहीत. पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांच्या पुनर्वसनासाठी किंवा त्यांच्या बाजूने आवाज उठवण्यासाठी कुठलाही ठोस प्रयत्न दिसत नाही. ही शांतता केवळ निराशाजनक नाही, तर प्रश्न निर्माण करणारी आहे. समाजातील अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची जबाबदारी केवळ पोलिसांवर नसून, सामाजिक संघटनांवरही तितकीच आहे.पेणसारख्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या शहरासाठी ही घटना लज्जास्पद आहे. एका बाजूला गणेश मूर्तींच्या माध्यमातून संस्कृती जपणारे कारागीर, आणि दुसऱ्या बाजूला अशा अनैतिक कृत्यांमुळे निर्माण होणारी बदनामी ही विसंगती समाजाला अस्वस्थ करणारी आहे.

- **स्थानिक प्रशासनाची जबाबदारी कुठे आहे?**
- **पोलिसांनी या आधी अशी कारवाई का केली नाही?**
- **महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या संघटना या वेळी गप्प का आहेत?**
- **अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी कोणती ठोस यंत्रणा आहे?**

या घटनेनंतर केवळ आरोपींवर कारवाई करून भागणार नाही. संपूर्ण यंत्रणेचा आढावा घेऊन दोषींवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. तसेच, पीडित महिलांच्या पुनर्वसनासाठी आणि अशा बळजबरीच्या व्यवसायांना आळा घालण्यासाठी अधिक सक्षम उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.पेणची ओळख ही विद्वत्ता, संस्कृती आणि कलेमुळे आहे. काही मोजक्या लोकांच्या चुकीच्या कृत्यांमुळे संपूर्ण शहराची प्रतिमा मलिन होऊ देणे योग्य नाही. आता वेळ आली आहे ती आत्मपरीक्षणाची आणि ठोस कृतीची. पेणने पुन्हा एकदा आपल्या उज्ज्वल परंपरेला साजेसं उभं राहायला हवं कारण इतिहासाचा अभिमान जपायचा असेल, तर वर्तमान शुद्ध ठेवणं तितकंच आवश्यक आहे.

## आरटीई प्रवेशांसाठी सोमवारी सोडत

**| रायगड | प्रतिनिधी |**

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी सहा एप्रिल रोजी सोडत काढण्यात येणार आहे. सोडतीमध्ये प्रवेश जाहीर होणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी, प्रतीक्षा यादी तयार करण्यात येणार असून, सोडतीनंतर शाळांतील प्रत्यक्ष प्रवेश सुरू केले जाणार आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे याबाबतची माहिती दिली. 'आरटीई' २५ टक्के प्रवेशासाठी विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून १ किलोमीटरच्या अंतरातील शाळा निवडण्याची शिक्षण विभागाने घातलेली अट उच्च न्यायालयाने रद्द केली. त्यानंतर प्राथमिक शिक्षण संचालनालयाने आधी अर्ज भरलेल्या पालकांना पुन्हा अर्ज भरण्यासाठी, तसेच अर्ज न भरलेल्या पालकांना अर्ज भरण्याची संधी दिली.

यंदा आरटीई प्रवेशांसाठी राज्यातील ८ हजार ७०१ शाळांमध्ये १ लाख १४ हजार ८२६ जागा उपलब्ध आहेत. अर्ज भरण्यासाठी ३१ मार्चपर्यंत दिलेल्या मुदतीमध्ये २ लाख ८९ हजार ४९८ अर्ज दाखल झाले. गेल्या वर्षी ३ लाख ५ हजार १५१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा आरटीईच्या अर्जांमध्ये घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. गोसावी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५ टक्के ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सोडत सोमवारी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथे शिक्षण आयुक्तांच्या हस्ते काढण्यात येणार आहे.

सोडतीचे थेट प्रक्षेपण यूट्युबवर केले जाणार आहे. सोडत काढून प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची शाळानिहाय यादी जाहीर केली जाणार आहे. पालकांना पाल्यांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारची प्रलोभने दिले जात असल्यास अशा प्रलोभनांना बळी पडू नये.

## माझी लाडकी बहीण योजना ई-केवायसीला मुदतवाढ

**| रायगड | प्रतिनिधी |**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना राज्य सरकारकडून राबविली जाते. या योजनेअंतर्गत गरजू महिलांच्या बँक खात्यात मासिक १५०० रुपये जातात. परंतु अनेक अपात्र लाभार्थ्यांनी या योजनेत अर्ज केले होते. त्यामुळे राज्य सरकारकडून पात्र लाभार्थी महिलांचे ई-केवायसी प्रक्रिया करत आहे. या प्रक्रियेस राज्य सरकारने मुदतवाढ दिली आहे.

राज्य सरकारच्या महिला व बाल विकास विभागामार्फत 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना राबविली जाते. या योजनेत पात्र नसतानाही अनेकांनी गैरफायदा घेत योजने अर्ज केले होते. त्यामुळे त्या महिलांना अपात्र करण्याची प्रक्रिया केली जात आहे. पात्र लाभार्थी महिलांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी माध्यमातून आधार पडताळणीद्वारे प्रक्रिया करायची होती.

या योजनेंतरर्गत लाभार्थींची जलदगतीने पडताळणी करण्यासाठी ऑनलाईन ई-केवायसीमध्ये सुधारणा करण्याची संधी दिली. त्यानुसार ३१ मार्च २०२६ पर्यंत ही मुदत देण्यात आली होती. परंतु पुन्हा एकदा मुदतवाढ मिळालेली आहे.

## सौर कृषीसाठी ग्रामपंचायतींना निधी

**रायगड** : शेतकऱ्यांच्या कृषीपंपाला दिवसा वीजपुरवठा करता यावा, म्हणून मुख्यमंत्री सौर कृषीवाहिनीअंतर्गत विकेंद्रित वीजवाहिनीवर आधारित सौरऊर्जा प्रकल्प उभारले जात आहेत. त्याला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारकडून ५१२ ग्रामपंचायतींना प्रत्येकी पाच लाख रुपयांचा निधी दिली जाणार आहे. त्याकरिता सरकारकडून महावितरणला २५ कोटी रुपयांचा निधी दिला जाणार आहे. राज्यातील कृषी फिडर्सचे सौरऊर्जीकरण मिशन मोडवर केले जात आहे. त्यानुसार एकूण १६,००० मेगावॉट क्षमतेचे विकेंद्रित सौरऊर्जा निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक विकास आणि अर्थव्यवस्थेला हातभार लागणार असल्याने अशा प्रकारचे जास्तीत जास्त प्रकल्प उभारण्यास प्रोत्साहन दिले जावे, म्हणून ग्रामपंचायतींना राज्य शासनाकडून प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर पाच लाख रुपये प्रोत्साहनात्मक आर्थिक मदत दिली जाणार आहे.

## मुंबई विमानतळावर इन-टर्मिनल क्विक कॉमर्स सेवा सुरू

**| पनवेल | प्रतिनिधी |**

अदानी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड या भारतातील सर्वात मोठ्या खाजगी विमानतळ ऑपरेटरने आघाडीचे क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म ब्लिंकिटसोबत सहयोगाने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर भारतातील पहिली इन-टर्मिनल क्विक कॉमर्स सेवा सुरू केली आहे.

ही सेवा सध्या टर्मिनल २, डोमेस्टिक डिपार्चर येथे सुरू झाली आहे आणि याद्वारे विमानतळावर प्रत्यक्ष ॲप-आधारित डिलिव्हरीचा अनुभव घेता येणार आहे.

प्रवासी आता त्यांच्या गरजेच्या वस्तू ब्लिंकिट ॲपद्वारे मागवू शकतात आणि या वस्तू त्यांना टर्मिनलमध्ये बोर्डिंग गेट्स, लाउंज, फूड कोर्ट आणि ठराविक भागीदार आऊटलेट्स अशा ठिकाणी पोहोचवल्या जातील. प्रवासाच्या वेळेत कोणताही अडथळा न आणता ही डिलिव्हरी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांमार्फत केली जाईल, ज्यामुळे प्रवाशांना सुरक्षित आणि विनाअडथळा अनुभव मिळेल.

## चिपळुणातील सराफ बाजारात मंदी

**| चिपळूण | वृत्तसंस्था |**

अमेरिका-इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर चिपळूणमधील सराफ बाजारात मोठी उलथापालथ झाली आहे. सोन्या-चांदीच्या दरात अभूतपूर्व घसरण झाली आहे. गेल्या महिनाभरात सोन्याचे दर सुमारे २५ हजारांनी तर चांदीचे दर जवळपास ५० हजारांनी घसरल्याने बाजारात अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. सुरक्षित गुंतवणूक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोन्याकडे गुंतवणुकदारांनी सावध भूमिका घेतल्याने व्यवहार मंदावले आहेत.

जागतिक आर्थिक अस्थिरतेचा थेट परिणाम चिपळूण सराफ बाजारावर जाणवत आहे. शहर व ग्रामीण भागात ३०हून अधिक ज्वेलर्स दुकाने असून, सध्या बाजारपेठेत खरेदीपेक्षा जुने सोने बदलून नवीन दागिने घेण्याकडे ग्राहकांचा कल वाढल्याचे सराफ व्यावसायिकांनी सांगितले.मार्च महिन्याच्या सुरुवातीला सोन्याचे दर उच्चांकी पातळीवर होते. त्यामध्ये एका महिन्यात जवळपास २५ हजारांची घसरण झाली. चांदीच्या दरातही मोठी पडझड झाली. त्यामुळे बाजारातील आर्थिक व्यवहार मंदावले आहेत. सण-समारंभ व विवाहासाठी सोन्याची पारंपरिक मागणी असली तरी सध्याच्या अस्थिर वातावरणामुळे ग्राहक प्रतीक्षा धोरण स्वीकारताना दिसत आहेत.

### बाजारावर झालेले परिणाम

- नवीन सोन्याची खरेदी घटली
- जुने सोने बदलण्याचे प्रमाण वाढले
- गुंतवणूकदारांची सावध भूमिका
- सराफा बाजारातील व्यवहार मंदावले
- दरातील चढ-उतारामुळे अनिश्चितता वाढली

## जेएनपीए बंदराला जोडणारा पूल खचला

**| उरण | प्रतिनिधी |**

जेएनपीएच्या चौथ्या सिंगापूर या बंदराला जोडणारा पूल जसखारजवळ खचला आहे. त्यामुळे सुरक्षा म्हणून या पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे.आठ वर्षापूर्वी ६८ कोटी खर्च करून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हा पूल उभारला आहे. या पुलावरून दररोज हजारो अवजड कंटेनर वाहनांची वाहतूक होते.

आयात-निर्यात प्रक्रियेला गती देण्यासाठी तसेच वाढत्या वाहतुकीचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या जेएनपीएच्या चौथ्या बंदराला जोडणाऱ्या उड्डाणपुलाजवळील मार्गाचा काही भाग अचानक खचल्यामुळे या पुलाच्या कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा पूल जसखार गावाला वळसा घालत थेट चौथ्या बंदराला जोडण्यासाठी उभारण्यात आला आहे. सध्या तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे.

या पुलाच्या बांधकामाला सुरुवातीपासूनच वादाची किनार लाभली होती. या पुलाच्या कामामुळे जसखार गावातील श्रद्धास्थान असलेल्या श्री रत्नेश्वरी देवी मंदिराला तडे गेल्याचा आरोप स्थानिकांनी केला होता. आता पुलाचा भाग खचल्याने पुलाच्या दर्जाबाबत शंका उपस्थित होत असून, संबंधित यंत्रणांवर टीकेची झोड उठू लागली आहे. या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

**कामाची तपासणी आवश्यक**

काही दिवसांनी रत्नेश्वरी देवीचा जत्रोत्सव होणार आहे. त्यामुळे मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ अपेक्षित आहे. तसेच पुलालगत तयार करण्यात आलेल्या उद्यानामुळेही येथे नागरिकांची गर्दी वाढत आहे.

अशा परिस्थितीत निकृष्ट दर्जाच्या कामामुळे कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान, प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेत तातडीने दुरुस्ती सुरू केली असली तरी, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कामाच्या गुणवत्तेची काटेकोर तपासणी करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## वाशीतील घरगुती गॅस पुरवठा सेवा बंद होण्याच्या मार्गावर

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

वाशी येथील ग्राहक सहकारी संस्थेमार्फत पुरवली जाणारी घरगुती गॅस सिलिंडर सेवा बंद करण्याच्या संभाव्य हालचालींमुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली असून, उपमहापौर दशरथ भगत यांनी सेवा अखंड सुरू ठेवण्याची विनंती वजा मागणी केली आहे. ४ एप्रिल २०२६ रोजी संस्थेला पाठवलेल्या पत्राद्वारे त्यांनी गॅस पुरवठा हा जनहक्काचा विषय असल्याचे अधोरेखित केले आहे.

वाशी सेक्टर ५ मधील एचपी गॅस डीलर असलेल्या संस्थेने अनेक वर्षे अखंड व सुलभ सेवा दिल्याबद्दल नागरिकांच्या वतीने समाधान व्यक्त करतानाच, सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम घरगुती गॅस पुरवठ्यावर होत असल्याने ही बाब अधिक संवेदनशील ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे सेवा आपत्कालीन स्वरूपात सुरू ठेवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.

संबंधित संस्था ही सार्वजनिक सेवा पुरवणारी सहकारी संस्था असल्याने ग्राहकहिताला बाधा येणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

### सतीश लळीत यांनी उलगडला इतिहास | तारीख, नाममुद्रा असलेली १४२ वर्षांपूर्वीची रचना

# ओरोसमध्ये मूर्तीवर आढळला शिलालेख

**| ओरोस | वृत्तसंस्था |**

शिलालेख हे इतिहासाच्या अभ्यासाचे एक मुख्य साधन आहे. मात्र, देवतेच्या मूर्तीवर सहसा शिलालेख आढळत नाही. असे असताना सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ओरोस बुद्रुक येथील सातेरी मंदिर परिसरातील क्षेत्रपाल मंदिरात असलेल्या महिषासुरमर्दिनीच्या मूर्तीवर तारीख आणि नाममुद्रा असलेला १४२ वर्षांपूर्वीचा शिलालेख आढळून आला आहे. ही बाब अतिशय दुर्मीळ आहे, अशी माहिती पुरातत्त्व आणि मूर्तिशास्त्राचे अभ्यासक सतीश लळीत यांनी दिली.

सतीश लळीत म्हणाले, ओरोस बुद्रुक गावातील जिल्हा परिषद शाळा क्र. १ च्या जवळ सातेरी देवीचे मंदिर आहे. जवळच अन्य दोन छोटी मंदिरे आहेत. पैकी श्री देव क्षेत्रपाल या मंदिरात क्षेत्रपाल व वंशदेवतांच्या जोडीनेच महिषासुरमर्दिनीची सुमारे दोन फूट उंचीची काळ्या पाषाणातील सुबक मूर्ती आहे. या मूर्तीवर देवीच्या मागच्या डाव्या हातामागे स्पष्ट कोरलेला एक शिलालेख आढळून आला आहे. ता. २९ मे स. १८८४ रामजी कुमया च्यारी असा हा लेख आहे. यात २९ मे १८८४ हा काळाचा स्पष्ट उल्लेख इंग्रजी सनानुसार असून रामजी कुमया च्यारी हे व्यक्तिनाम कोरलेले आहे. कदाचित या तारखेला या मूर्तीची प्रतिष्ठापना झाली असावी व रामजी कुमया च्यारी नावाच्या दानशूर भाविक व्यक्तीने ही मूर्ती दान केली असावी, असा अर्थ यातून निघू शकतो. मूर्ती मंदिरात असल्याने ती आणि शिलालेख अत्यंत सुरक्षित असून कोणतीही झीज झालेली नाही, असे दिसून येते.




ते म्हणाले, क्षेत्रपाल ही ग्रामीण भागात सर्रास आढळणारी देवता आहे. ही देवता जमीन, शेत किंवा विशिष्ट भौगोलिक प्रदेशाची रक्षक देवता मानली जाते. गावाच्या किंवा जमिनीच्या सीमांचे दुष्ट शक्तींपासून संरक्षण करणे, हे त्यांचे कार्य आहे. सामान्यतः हे शिवाचे स्वरूप मानले जाते. शेतजमीन किंवा वास्तूच्या रक्षणार्थ क्षेत्रपाल देवतेला पूजले जाते. क्षेत्र अधिक पाल म्हणजे जमिनीचे रक्षण करणारा असा त्याचा अर्थ आहे. क्षेत्रपाल अनेकदा भैरव, म्हसोबा किंवा स्थानिक ग्रामदेवतेच्या रुपातही आढळतो. शेती पेरणीपूर्वी, गृहप्रवेशावेळी किंवा नवीन जमीन घेताना क्षेत्रपालाची पूजा करण्याची प्रथा आहे. क्षेत्रपाल हे ग्रामदेवता आणि कुलदेवता यांच्याशी संबंधित असून, त्यांना जमिनीचे रक्षक दैवत मानले जाते. अशा या क्षेत्रपाल मंदिरात महिषासुरमर्दिनीची ही मूर्ती स्थापित केली आहे, हे विशेष.

क्षेत्रपाल मंदिरातील महिषासुरमर्दिनी दुर्गेची मूर्ती स्थानक प्रकारची आणि चतुर्भुज आहे. मूर्तीच्या मागे नक्षीयुक्त प्रभावळ असून मध्यभागी वर कीर्तिमुख कोरले आहे. करंडक मुकुटाने आणि माफक दागिन्यांनी ती सुशोभित आहे. किरीटकुंडले अतिशय देखणी आहेत.

# निवडक



## शाळांना डिजिटल साहित्याचे वाटप

**तळा** : आ.निरंजन डावखरे यांच्या स्थानिक विकास निधीतून तळा तालुक्यातील शाळा,महाविद्यालयांना डिजिटल आणि शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.यामध्ये संगणक, प्रिंटर, प्रोजेक्टर आणि शिक्षणासाठी आवश्यक डिजिटल वस्तूंचा समावेश आहे. यावेळी दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस हेमा मानकर, तालुका उपाध्यक्ष महादेव आर्डे, तालुका युवा मोर्चा अध्यक्ष वैभव कदम,युवा शहराध्यक्ष सुयोग बारटक्के, माजी तालुका सरचिटणीस कृष्णकांत मानकर,बूथ आध्यक्ष जगदीश घाटवल आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी जिल्हा सरचिटणीस हेमा मानकर यांनी सांगितले की आमदार निरंजन डावखरे यांच्या माध्यमातून तळा तालुक्यातील शाळांना डिजिटल साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दर्जेदार शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि प्रेरणादायी उपक्रम आहे.आमदारांच्या या प्रयत्नांमुळे शिक्षण क्षेत्रात नवी दिशा मिळत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.



## वनविभागाची धडक कारवाई

**वाडा :** मुंबईअहमदाबाद महामार्गावरील मस्तान ते हालोली दरम्यान वनविभागाने केलेल्या धाडसी कारवाईत सोलिव खैर लाकडाची अवैध वाहतूक करणारा टेम्पो फिल्मी स्टाईल पाठलाग करून पकडण्यात आला. या कारवाईत सुमारे ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून वाहनचालकाला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वनविभागाला गुजरातकडून मुंबईच्या दिशेने खैर लाकडाची तस्करी करणारा टेम्पो जाणार असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार ४ एप्रिल रोजी जव्हार वन विभागाचे उपवनसंरक्षक डॉ. सैपून शेख यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षता पथकाचे वनपरिक्षेत्र अधिकारी शरण देशपांडे/ यांच्या नेतृत्वाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी सावा, जव्हार तसेच पाली डेपो येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या पथकाने महामार्गावर ठिकठिकाणी सापळा रचला. मध्यरात्री १२ ते १ वाजण्याच्या सुमारास संशयित टेम्पो महामार्गावर दिसताच वन अधिकाऱ्यांनी त्याचा पाठलाग केला. काही अंतरावर वाहन अडवून तपासणी केली असता आयचर कंपनीचा एमएच १२ आरएन १७९७ क्रमांकाचा टेम्पो सोलिव खैर लाकडाने भरलेला असल्याचे उघड झाले. वाहनातून सुमारे १५ घनमीटर खैर लाकूड आढळून आले. जप्त लाकडाची किंमत अंदाजे बाजारमूल्य १५ लाख रुपये असून वाहनाची किंमत सुमारे २० लाख रुपये असल्याने एकूण ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी टेम्पो चालक उमेशकुमार शुक्ला (उत्तर प्रदेश) याला वनविभागाने ताब्यात घेत गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.



## स्थानिकांचा जन आक्रोश मोर्चा

**बोईसर :** पालघर जिल्ह्यातील विराज प्रोफाइल या स्टील उद्योगाच्या नियोजित विस्तारीकरण प्रकल्पाविरोधात स्थानिक नागरिकांनी भर उन्हात जन आक्रोश मोर्चा काढला. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आठ एप्रिल रोजी होणारी पर्यावरण मंजुरीसाठीची जन सुनावणी रद्द करण्याची प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. या मोर्चामध्ये शेकडो नागरिक सहभागी झाले होते. आंदोलकांनी विराज कंपनी विरोधात जोरदार घोषणाबाजी करून बोईसर चिल्हार रस्त्यावरील वाहतूक काही वेळ रोखून धरली. मोर्चादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नाही यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. विराज प्रोफाइल एसआरएम उद्योगाच्या विस्तारीकरणा विरोधात शनिवारी मान ग्रामपंचायत ते विराज प्रोफाइल कंपनीचे हाथी गेटपर्यंत मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये सर्वपक्षीय राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्चामध्ये सामील झालेल्या नागरिकांनी बोईसर चिल्हार मार्ग काही वेळ रोखून धरल्याने वाहतूक ठप्प झाली होती. मोर्चामध्ये कुंदन संखे, समीर मोरे, भावेश चुरी, प्रशांत पाटील, अविनाश पाटील, डेरिल डिमेलो, सचिन लोखंडे, महेंद्र भोणे, अंकुर राऊत, नीता काटकर, अशोक शिंगाडा, अंजली भावर, राहुल पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक महिला पुरुष सहभागी झाले होते.

## कोकणातील नमन कलेला नवचैतन्य

**संगमेश्वर** : कोकणातील पारंपरिक नमन लोककलेला सध्या नवसंजीवनी मिळाली आहे. गावोगावी होणाऱ्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये या कलेची मागणी लक्षणीयरित्या वाढली आहे. सार्वजनिक महापूजा तसेच ग्रामदैवतांच्या जत्रांमध्ये नमन कार्यक्रमांना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे कलाकारांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत असून, रसिकांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पूर्वी वीज किंवा आधुनिक साधने नसताना गॅसबत्तीच्या प्रकाशात नमन सादर केले जात असे. त्या काळात लोक अनेक किलोमीटर पायी चालत जाऊन नमन पाहत असत. आज आधुनिक ध्वनी व प्रकाशयोजनांमुळे सादरीकरण अधिक आकर्षक झाले असले तरी कलेचा पारंपरिक आत्मा कायम आहे. सध्या प्रत्येक तालुक्यात अनेक नमन मंडळे कार्यरत असून, कलाकार स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत प्रयोग सादर करत आहेत. दिवसभर काम किंवा शिक्षण करून रात्री रंगमंचावर उभे राहणारे कलाकार ही परंपरा जपताना दिसतात.नमन सादरीकरणात गण, गवळण, फार्स व वगनाट्य यांचा समावेश असतो. विनोदी संवाद, राधा-कृष्ण कथा आणि पौराणिक प्रसंग रसिकांना आकर्षित करतात. जत्रांचा हंगाम आणि शासनाच्या महोत्सवांमुळे नमनकलेचे सुवर्ण दिवस पुन्हा परतल्याची भावना व्यक्त होत आहे.

# जत्रेचा मंच बनला आंदोलनाचा आवाज

**। तळा । प्रतिनिधी ।**

बारपे गावात सुरू असलेल्या खडी क्रशर प्रकल्पाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र भूमिका घेतली असून प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनोख्या पद्धतीने आंदोलन छेडले आहे. महागाव येथील वरदायीनी देवी जत्रेच्या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी हातात बॅनर घेऊन शांततापूर्ण पण ठाम विरोध दर्शवला. गेल्या काही महिन्यांपासून तळा तालुक्यातील बारपे गावातील परिसरात सुरू असलेल्या खडी क्रशरमुळे धूळ प्रदूषण, आवाजाची समस्या आणि शेतीवर होणारा परिणाम याबाबत ग्रामस्थांमध्ये असंतोष वाढत आहे. स्थानिकांच्या मते, या प्रकल्पामुळे पिकांचे नुकसान होत असून नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे.

गावातील पारंपरिक जत्रेत मोठ्या संख्येने लोक एकत्र येतात, याच संधीचा फायदा घेत ग्रामस्थांनी

## खडी क्रशरच्या दुष्परिणामांवर ग्रामस्थांचा एल्गार




आंदोलन उभारले. खडी क्रशर बंद करा, आरोग्याला प्राधान्य द्या, शेती वाचवा खडी क्राशर हटवा, खडी प्रोजेक्ट विनाश प्रोजेक्ट ही माती आमची आई आहे आईचा श्वास घोटणारा क्रशर आम्हाला मान्य नाही, आई सोमजाई, आई वरदायीनी देवी आमच्या पूर्ण गावाचा विरोध असताना आपल्या भागात एक विनाशकारी स्टोन क्रशरचा प्रकल्प होत आहे, तो प्रकल्प मुळासकट बंद व्हावा यासाठी आम्हाला बळ दे अशा घोषणांचे बॅनर घेऊन ग्रामस्थांनी प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली.

ग्रामस्थांनी सांगितले की, अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे जत्रेसारख्या सार्वजनिक कार्यक्रमातून प्रश्न मांडण्याचा निर्णय घेण्यात आला. काही नागरिकांनी असा आरोप केला की, संबंधित प्रकल्पाला परवानगी देताना स्थानिकांचा विचारच करण्यात आलेला नाही.तहसील कार्यालयाकडून अनाधिकृत उत्खनन बाबतीत संबंधीतांवर दंडात्मक कारवाई करण्याच्या नोटीस जारी केल्या गेल्या परंतु अजूनही कुठली ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. खडी क्रशरचे काम सुरूच आहे. प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी या आंदोलनाचा पर्याय निवडला आहे. याबाबतीत प्रशासन कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.मात्र ग्रामस्थांनी जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.या आंदोलनाला आता राजकीय स्वरूपही येण्याची शक्यता आहे.

वरदायीनी देवी जत्रेला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आ.अनिकेत तटकरे यांनी भेट दिली या भेटी दरम्यान आंदोलनकर्त्या ग्रामस्थांनी तटकरे यांची भेट घेऊन खडी क्रशर विरोधात बाबत ग्रामस्थांची भूमिका मांडली व आगामी काळात हा मुद्दा अधिक तीव्रतेने मांडण्यात येईल आंदोलन देखील मोठे होणार असल्याचे सांगितले तटकरे यांनी ग्रामस्थांचे म्हणणे एकूण घेतले आहे त्यामुळे एकूणच, बारपे येथील खडी क्रशरविरोधातील आंदोलन आता प्रशासनासाठी डोकेदुखी ठरणार असून, यावर काय निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आरोग्यावर परिणाम

बारपे गावातील परिसरात सुरू असलेल्या खडी क्रशरमुळे धूळ प्रदूषण, आवाजाची समस्या आणि शेतीवर होणारा परिणाम याबाबत ग्रामस्थांमध्ये असंतोष वाढत आहे. स्थानिकांच्या मते, या प्रकल्पामुळे पिकांचे नुकसान होत असून नागरिकांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे.

## निवडक




### कर्जत प्रकल्प अंतर्गत शेळी प्रशिक्षण

**कर्जत** : रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील अतिशय दुर्गम असलेल्या अंभेरपाडा ग्रामपंचायत येथील आदिवासीबहुल असलेली काठेवाडी, बेलाचीवाडी आणि अंभेरपाडा गावातील शेतकऱ्यांना युनायटेड वे मुंबई संस्थेद्वारा कार्यान्वयित आणि मेटलर टोलेडो अर्थसहाय्यित जल संजीवनी, कर्जत प्रकल्प अंतर्गत शेळी प्रशिक्षण आणि वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. प्रगतीशील शेतकरी आणि शेळीतज्ज्ञ संतोष धुमाळ यांनी याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी एकूण १४ शेतकऱ्यांना (अंभेरपाडा गावातील ०६, बेलाचीवाडी येथील ०५ आणि काठेवाडी गावातील ०३) लाभार्थ्यांना प्रत्येकी ५ शेळी आणि एक बोकुड असे एकूण ७० शेळ्या आणि १४ बोकुड वितरीत करण्यात आले. शेतकऱ्यांनी फक्त पिकावर उत्पन्नासाठी अवलंबून न राहता, शेळीपालनासारखे कमी खर्चिक परंतु प्रभावी शेतीपूरक जोडधंद्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणे हा सदर उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. सदर उपक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यासाठी युनायटेड वे मुंबई कार्यरत जलसंजीवनी टीमने विशेष परिश्रम घेतले.



### दिनेश शुक्ला यांना ‘उद्योजक रत्न’

**रसायनी** : रसायनी कोन रस्त्यावरील शिवगंगा वॉटर पार्कचे मालक दिनेश अवंधनारायण शुक्ला यांना महाड येथे स्वराज्य भूमी गौरव संमेलनात आदर्श उद्योजक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आई फाऊंडेशन भारत, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व समृध्दी पब्लिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या स्वराज्य भूमी गौरव संमेलन सन २०२६ कार्यक्रमात सुप्रसिद्ध अभिनेता संतोष पाटील,पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे,उदय भाऊसाहेब वाघेरे, संचालक, ग्रुप ऑफ कंपनी- पिंपरी पुणे, डॉ. बी. एन. खरात संचालक समृद्धी पब्लिकेशन युवा पुरस्कार विजेते, महाराष्ट्र शासन,डॉ. विनोदराव मोरे संस्थापक अध्यक्ष आई फाउंडेशन, रायगड (भारत) यांच्याहस्ते करण्यात आला. शुक्ला यांनी उद्योगा व्यतिरिक्त सामाजिक कार्यातही आपला ठसा उमटवला आहे.गोरगरीबांना किराणा सामान वाटप करणे, रक्ततपासणी शिबिर,दारू बंदी, व्यसन मुक्ती साठी कार्यरत असून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करीत असतात.दिनेश शुक्ला यांचे प्रामाणिक व कार्यक्षम व्यक्तिमत्व असून सर्वांशी आपलेपणाने वागत असल्याने ते नागरिकांत लोकप्रिय आहेत. त्यांच्या कार्यांची दखल घेऊन त्यांना सिनेस्टार अभिनेते संतोष पाटील यांच्याहस्ते सन्मानित केल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### वन संरक्षण समितीचा कारभार पारदर्शक असावा : योगेश जाधव

**माथेरान** : माथेरानमध्ये पर्यटन वाढीसाठी आवश्यक उपाययोजना करताना मुख्यत्वे पर्यटन स्रोतावर अधिकाधिक भर देऊन होणाऱ्या नवीन सदस्यांच्या कार्यकारिणी मधील सर्वच मंडळींनी वन संरक्षण समितीचा कारभार पारदर्शकपणे करून या स्थळाच्या सर्वांगीण विकासाची उंची वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत असे वन संरक्षण समितीचे माजी अध्यक्ष योगेश जाधव यांनी आपले मत व्यक्त केले. जवळपास आठ वर्षे त्यांनी अध्यक्ष पद सांभाळताना अनेक महत्वाकांक्षी विकासात्मक कामे मार्गी लावण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न केले होते. यामध्ये महत्वाच्या पॉईंट्सवर सुरक्षित कठडे बसविण्यात आल्या. त्याचप्रमाणे दरवर्षी पावसाळ्यात वृक्षारोपण आणि संवर्धन करणे, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात करिअर करण्यासाठी पुढाकार घेऊन मदतीचा हातभार, एकूण पाच विधवा महिलांना मर्यादित काळासाठी स्वच्छतेची कामे दिली आहेत. जागोजागी कचराकुंड्या लावून स्वच्छता राखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. दस्तुरी नाक्यावर वाहन करांच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा सुयोग्य पद्धतीने वापर करून आजमितीला सत्तर लाख रुपयांची शिल्लक रक्कम बँकेत जमा आहे. या पैशाचा गावाच्या विकासासाठी उपयोग व्हायला हवा.जी मंडळी खरोखरच गावासाठी निस्वार्थपणे योगदान देऊ शकतात. कोणत्याही प्रकारची अभिलाषा न बाळगता पर्यटन वाढीसाठी सहकार्याची भूमिका बजावू शकतात अशाच लोकांना या समितीमध्ये समाविष्ट करण्यात यावे, असे माजी अध्यक्ष योगेश जाधव यांनी सांगितले.




## क्लासिफाईड
**जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी**

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **रेडस्टोन हॉलिडे होम अँड स्पा या** रिसॉर्टसाठी वेटर आणि हाऊसकिपींग या कामासाठी पुरूष कामगार हवे आहेत. राहण्याची व जेवण्याची व्यवस्था केली जाईल. पगार -१३००० रूपये **संपर्क** : ७७९८२४१०४०
- ***JOB VACANCY*** अलिबागमध्ये दवाखान्यात कामाला नर्स/रिसेपशनिस्ट व ड्रायव्हर पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२
- **अलिबागमध्ये आर्किटेक्चर** ऑफिसमध्ये कॉम्प्युटर्सचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. संपर्क : ९२७०८२७८२९/९४२२०९४१५१
- **अलिबाग तालुक्यातील कुर्डूस** हद्दीमध्ये पोयनाड नागोठणे रस्त्यालगत आंबा, नारळ, चिकूची, झाडे असलेली १ एकर जागा विकणे आहे. लाईट, पाणी, रस्ता उपलब्ध मो.९२८४५०६०४१

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## पेणमध्ये राज्यस्तरीय नाट्य महोत्सव

**। पेण । प्रतिनिधी ।**

दत्त अवधूत एंटरटेनमेंट आणि स्वरसंग पेण यांच्या संयुक्त विद्यमाने पेणमध्ये राज्यस्तरीय दोन अंकी नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात तब्बल १२ दिवस १२ दर्जेदार नाटकांचे सादरीकरण होणार असून, प्रेक्षकांना विनामूल्य प्रवेश देण्यात आला आहे. हा भव्य नाट्य महोत्सव १९ एप्रिल ते १ मे दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

महोत्सवामध्ये राज्यभरातील विविध नाट्यसंस्थांचा सहभाग असून, दररोज वेगवेगळ्या विषयांवरील नाटके सादर केली जाणार आहेत. यामध्ये डिंक, खाजगीवाली, अजून अंधार दाटून आहे, नकळत दिसले सारे, कोणाकडे होतो जी कोणाची सोय, करमणूक टाइम्स, ती ती आणि ती, अनपेक्षित, विदूषक, ब्रेकपॉईंट, तहान आणि पुनरागमन अशा नाटकांचा समावेश आहे.

या उपक्रमामुळे पेण शहरातील नाट्यप्रेमींना दर्जेदार रंगभूमीचा अनुभव घेण्याची संधी मिळणार असून, स्थानिक कलाकारांना देखील व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. सांस्कृतिक चळवळीला चालना देणारा हा उपक्रम ठरणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## समीर देवघरे आदर्श पर्यावरण प्रेमीने सन्मानित

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

रायगड प्रेस क्लबशी संलग्न असलेली खालापूर प्रेस क्लब १९ वा वर्धापन दिन महाराजा मंगल कार्यालय खोपोली येथे रायगड प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांच्या उपस्थित हा कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विविध क्षेत्रात काम करीत असलेल्या व्यक्तीची दखल त्यांना विविध क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आला,यावेळी १७ पुरस्कार वितरण करण्यात आले.

यावेळी ग्रुप ग्रामपंचायत इसांबे उपसरपंच समीर देवघरे यांस आदर्श पर्यावरण प्रेमीने सन्मानित,करण्यात आले. यावेळी सह कुटूंब उपस्थित राहून मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



या पुरस्कार सोहळा सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आले होते. अल्प वयातच राजकारणाचे धडे गिरवत सदस्य ते उपसरपंच या पदावर विराजमान झाले.मात्र आपल्या कामातून समाज्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल अबाधित राहावे यासाठी त्यांनी स्वताला झोकून दिले. त्यांच्या कामाची दखल खालापूर प्रेस क्लब आयोजित वर्धापन दिन तथा पुरस्कार सोहळ्यास त्यांस सन्मानित करण्यात आले.

समीर देवघरे हे उत्तम व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्या कडे पाहिले जाते, आजवर त्यांनी अनेक उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम करीत असल्यामुळे त्यांस आदर्श पर्यावरण प्रेमी पुरस्कार खोपोली नगराध्यक्ष कुलदीप शेंडे, उप नगराध्यक्ष विक्रम साबळे, वृत्तनिवेदिका न्युज १८ सुवर्णा जोशी, बिग बॉस फेम सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, खासदार मावळ लोकसभा श्रीरंग आप्पा बारणे, रायगड जिल्हा परिषद सदस्य तथा गट नेते संतोष बैलमारे, सचिव अ.भा.म.प.महाराष्ट्र राज्य मनोज खांबे, तसेच खालापूर, खोपोली पोलीस अधिकारी यांच्या उपस्थित हा पुरस्कार त्यांस प्रदान करण्यात आला.

## झुगरे वाडी येथे शाळा प्रवेशोत्सव साजरा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

झुगरेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत मराठी माध्यमात प्रवेश घेणारी नाव विद्यार्थ्यांचा प्रवेश उत्सव साजरा करण्यात आला. या प्रवेश उत्सवाच्या निमित्ताने रोटरी क्लब वरळी कडून नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले.

झुगरे वाडी येथे इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वरळी यांच्या माध्यमातून नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शैक्षणिक साहित्य वाटप करून, नवीन आदर्श घालून दिला असून, इयत्ता पहिली त येणाऱ्या विद्यार्थ्यांना हे साहित्य मिळाल्याने



त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शिक्षण विभागात विविध महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यास सुरुवात केली असून या उपक्रमाचा भाग म्हणून, मराठी शाळांचा पट वाढविण्यासाठी इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करण्यात आले.

या विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वरळी यांचे माध्यमातून रविवारी शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या वेळी शाळेसाठी स्पीकर व प्रिंटर भेट देण्यात आले असून सांस्कृतिक कार्यक्रम, व शासकीय कार्यक्रमासाठी यांचा वापर होणार असून एक लाख रुपये किंमतीचे साहित्य शाळेसाठी देण्यात आले.

## बाळकृष्ण देशमुख यांचे निधन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**



रसायनी देवळोली गावचे बाळकृष्ण देशमुख यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा दत्तात्रेय देशमुख, मोहन देशमुख, सुरज देशमुख, गिरीश देशमुख, गजानन देशमुख दोन विवाहित मुली जावई, बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी गुरुवारी धार्मिक रितीरिवाजानुसार श्री क्षेत्र धाकटी पंढरी साजगाव येथील पाताळगंगा नदीच्या संगमावर होणार आहेत.

### वडके हायस्कूलमध्ये निधी फाऊंडेशनतर्फे

## शैक्षणिक किट वाटप सोहळा उत्साहात



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

एस. एम. वडके हायस्कूल येथे आज निधी फाऊंडेशनतर्फे शैक्षणिक किट वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी योग्य शैक्षणिक मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना वह्या, पेन, शैक्षणिक साहित्य आदींचा समावेश असलेले किट वाटप करण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा थेट लाभ झाला. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधनांची कमतरता भासते, अशा परिस्थितीत निधी फाऊंडेशनने उचललेले हे पाऊल अत्यंत मोलाचे असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

निधी फाऊंडेशन गेल्या काही वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात विविध उपक्रम राबवत असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. केवळ शैक्षणिक साहित्य वाटपापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअर, स्पर्धा परीक्षा, तसेच जीवन कौशल्य याबाबत मार्गदर्शन देण्याचेही काम संस्था करीत आहे. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळण्यास मोठी मदत होत आहे. या कार्यक्रमात निधी फाऊंडेशनचे कृष्णा कदम, गणेश थळे, चेतन लिखिमले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत मेहनत, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर यश मिळविता येते, असे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी वडके हायस्कूलचे मुख्याध्यापक यांनी निधी फाऊंडेशनचे आभार मानत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना मोठा आधार मिळतो, असे सांगितले. शिक्षकवृंदांनीही या उपक्रमाचे स्वागत केले व विद्यार्थ्यांना याचा मोठा लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

## विशाखा बडेकर यांना पदवी प्राप्त



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

पाताळगंगा परिसरातील वाशिवली येथील बडेकर कुटुंबातील कन्या विशाखा बडेकर यांनी न्यूरो आणि सायकोसोमॅटिक डिसऑर्डर्स या विषयात मास्टर्स ऑफ फिजिओथेरपी ही पदवी यशस्वीरित्या प्राप्त केली आहे. त्यांनी ही दोन वर्षांची पदव्युत्तर पदवी सुमनदिप विद्यापीठ,वडोदरा येथून पूर्ण केली.

## लिटिल आयडल किड्स स्कूलचा बक्षीस समारंभ

**। उरण । प्रतिनिधी ।**

लिटिल आयडल किड्स नवीन पनवेल या स्कूल चा बक्षीस समारंभ आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे गुरुवारी (दि.२) मोठ्या उत्साहात संपन्न झाला. स्मरण या संकल्पनेवर आधारित सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते आणि या कार्यक्रमाला विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




बक्षीस समारंभाच्या या कार्यक्रमाला पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक गणेश कडू, आवाज महामुंबईचा चॅनेलचे संपादक तथा पत्रकार उत्कर्ष समितीचे रायगड जिल्हा अध्यक्ष मिलिंद खारपाटील, मुंबई महानगरपालिकेचे सहाय्यक करनिर्धारक व संकलक एम/पूर्व एन.डी. खान, संगीत शिक्षक दिपक कदम, अतुल तांबे, विश्वास भगत, लिटल आयडल स्कूल च्या प्रिन्सिपॉल पूनम गुप्ता, चेअरमन मनोज गुप्ता, सर्व शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी छोट्या छोट्या बच्चे कंपनीने सुरेख नृत्य करून उपस्थितांची मने जिंकली. टाळ्या आणि वन्स मोअर असा जोरदार प्रतिसाद होता.

गणेश कडू यांनी विद्यार्थी आणि शिक्षक यांचे तोंड भरून कौतुक केले. याचबरोबर विद्यार्थ्यांची चांगली तयारी केल्याबद्दल शिक्षकांना धन्यवाद दिले.पालकांनी आता निश्चित राहावे. कारण अतिशय चांगल्या शाळेत तुम्ही मुलांना पाठवले आहे असेही ते म्हणाले.

### लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर | नगरपलिका प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी

## नवनाथ उद्यानाची दयनीय अवस्था

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण नगरपालिका प्रभाग क्रमांक १० मधील नवनाथ उद्यानाची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नवनाथ उद्यानाच्या प्रवेशद्वारावरील कोनशीला गायब झाली असून संपूर्ण परिसराकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे चित्र दिसत आहे.

नवनाथ उद्यानाच्या संरक्षण भिंतीवरील लोखंडी जाळीही चोरीस गेली किंवा काढून टाकण्यात आली आहे. त्यामुळे उद्यानाची सुरक्षितता धोक्यात आली असून कोणालाही सहज प्रवेश करता येत आहे. विशेष म्हणजे, लहान मुलांसाठी बसवण्यात आलेले झोपाळे तुटलेल्या अवस्थेत असून ते वापरणे अत्यंत धोकादायक ठरत आहे.



या तुटलेल्या झोपाळ्यांमुळे लहान मुलांना इजा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पालक वर्गात याबाबत भीतीचे वातावरण असून, नवनाथ उद्यानात मुलांना पाठवताना चिंता व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या समस्येकडे नगरपालिका प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींकडून सातत्याने दुर्लक्ष होत आहे. अनेकदा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

तरी संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन नवनाथ उद्यानाची दुरुस्ती करावी, तुटलेली साधने बदलावी आणि सुरक्षा व्यवस्था मजबूत करावी, सुरक्षितता वाढवावी अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. अन्यथा एखादी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही पेणमधील नागरिकांनी पेण नगरपालिका प्रशासनाला दिला आहे.

# डिझेल दरवाढीमुळे कोकणातील मच्छिमारी व्यवसाय संकटात

## नौका बंद ठेवण्याची मच्छिमारांवर वेळ

। रायगड । प्रतिनिधी ।

आखाती भागात सुरू असलेल्या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाचे संकट निर्माण झाले आहे. याचा थेट परिणाम कोकण किनारपट्टीवरील मच्छिमारी व्यवसायावर झाला असून, औद्योगिक डिझेलच्या दरात प्रचंड वाढ झाल्याने मच्छिमार सहकारी संस्था आणि मच्छिमार मोठ्या संकटात सापडले आहेत.

तेल कंपन्यांकडून डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा मोठी वाढ करण्यात आल्याने मच्छिमारी बंद पडण्याच्या स्थितीत आहे. मच्छिमार सहकारी संस्थांना तेल कंपन्यांकडून मिळणाऱ्या डिझेलच्या दरात मोठी तफावत निर्माण झाली आहे. यापूर्वी प्रति लिटर ९५ रुपयांवरून ११५ रुपये अशी वाढ झाल्यानंतर, आता थेट १४४ रुपयांपर्यंत दर वाढविण्यात आले आहेत.



### मच्छिमारांची कोंडी: मिळणारा परतावा की स्वस्त डिझेल?

सामान्य पेट्रोल पंपावर सुटे डिझेल कमी दरात उपलब्ध असले, तरी मच्छिमार संस्थांकडून डिझेल घेण्याशिवाय मच्छिमारांकडे पर्याय नाही. शासनाकडून मिळणाऱ्या डिझेल परताव्याच्या रकमेतून मच्छिमार आपल्या कर्जाची परतफेड करत असतात. जर सुटे डिझेल खरेदी केले, तर हा परतावा मिळत नाही आणि संस्थांकडून घेतले तर वाढीव दराचा फटका बसतो, अशा दुहेरी कात्रीत मच्छिमार अडकला आहे.

### हॉटेल व्यवसाय ठप्प, मासळीची मागणी घटली

इंधन संकट केवळ डिझेलपुरते मर्यादित राहिलेले नाही. कमर्शिअल गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने अनेक हॉटेल व्यावसायिकांनी आपली हॉटेल्स बंद ठेवली आहेत किंवा खाद्यपदार्थांवर निर्बंध आणले आहेत. हॉटेलमधून मासळीची खरेदी थांबल्याने मच्छिमारांना बाजारात योग्य दर मिळेनासा झाला आहे.

मच्छिमार संस्थांना चुकीच्या पद्धतीने ग्राहकांच्या श्रेणीत समाविष्ट केल्यामुळे ही दरवाढ सोसावी लागत आहे. या दरवाढीमुळे नौका चालवणे आता मच्छिमारांच्या आवाक्याबाहेर गेले आहे

# भोंदूगिरीविरोधात अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा एल्गार

। रायगड । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र राज्यातील अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या संघटन बांधणीच्या निमित्ताने आणि भोंदू बाबा अशोक खरातचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र राज्य संघटक हरिभाऊ पाथोडे आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष रवींद्र खानविलकर तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते शशी गमरे, कैलास मोहिते, जगन्नाथ साबळे सध्या कोकण दौऱ्यावर आहेत.

यादरम्यान त्यांनी रायगड शाखेस भेट दिली. रायगड शाखेतील कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी दि.४ एप्रिल रोजी संध्याकाळी ५ वाजता के. आ. बाठिया हायस्कूल नवीन पनवेल या ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर सभेमध्ये संघटन बांधणी बरोबर भोंदू बाबा अशोक खरातचा निषेध व्यक्त करण्यासाठी आणि सरकारला जादूटोणाविरोधी कायद्याच्या कठोर अंमलबजावणीची आठवण करून देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. सदर सभा यशस्वी करण्यासाठी तसेच आपल्या परिसरातील अंधश्रद्धे संदर्भात चर्चा करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती रायगड शाखेतील सर्व सदस्य व सभासद एकत्र आले होते.

अध्यात्माचे ढोंग घेऊन समस्याग्रस्त स्त्री-पुरुषांचे शोषण करणाऱ्या, फसवणूक करणाऱ्या भोंदू खरात सारख्या विकृती समाजामध्ये अधून मधून निर्माण होण्याची कारणे तपासून त्यावर ठोस उपाययोजना काय करता येतील, या विषयावर विचारमंथन करण्यासाठी सदर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे महाराष्ट्र राज्य संघटक हरिभाऊ पाथोडे आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष रवींद्र खानविलकर तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते शशी गमरे, कैलास मोहिते, जगन्नाथ साबळे यांनी मार्गदर्शन करून भोंदूगिरी विरोधात एल्गार केला.

# खोपोलीत मटकाचालक अटकेत

। खोपोली । प्रतिनिधी ।

खोपोली बाजारपेठ हद्दीत छुप्या पद्धतीने चालणाऱ्या बेकायदेशीर मटका जुगारावर रायगड स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने गुरुवारी (दि.२) धाड टाकली. या कारवाईत मटका चालवणाऱ्या शांताराम पडघमकर याला रंगेहाथ पकडले असून, त्याच्याकडून रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

खोपोली बाजारपेठत शांताराम पडघमकर लोकांकडून पैसे घेऊन कल्याण नावाचा मटका चालवत असल्याचे गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांना समजले होते. त्याला पकडण्यासाठी पोलिसांनी सापळा रचला. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील, सहाय्यक फौजदार संदीप पाटील, पोलिस हवालदार प्रतीक सावंत, रवी मुंडे, रणजितसिंह खराडे आणि पोलीस शिपाई प्रदीप खरात यांनी सापळा रचला. शांताराम पडघमकरला स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने रंगेहाथ पकडले. शांताराम पडघमकरजवळ मटका जुगार खेळण्यासाठी लागणारे साहित्य आणि तीन हजार ४५ रुपये रोख रक्कम सापडली. हे सर्व साहित्य स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने जप्त केले आहे.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने- नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# कोप्रोली ग्रामस्थांनी एमएमआरडीए अन् राज्य सरकारचा केला निषेध

। उरण । प्रतिनिधी ।

एमएमआरडीएने उरण तालुक्यातील कोप्रोली गावच्या वेशीवर काळे पिवळे चौकटीत मार्किंगला केले होते. गुरुवारी (दि.२) कोप्रोली ग्रामस्थ व सर्व पक्षांचे प्रमुख कार्यकर्त्यांनी एकत्र येत या मार्किंगला काळे फासून निषेध केला. उपस्थितांनी सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा तीव्र निषेध करत या मार्किंगवर टायर जाळून सरकार आणि एमएमआरडीएला इशारा दिला आहे.

जमीन, घर आणि गाव वाचवा एमएमआरडीए हटवा, जमीन आमच्या हक्काची नाही कुणाच्या बापाची असे नारे देत शेती घरे आणि गाव वाचवण्यासाठी ग्रामस्थांनी एल्गार केला आहे.

तत्पूर्वी एमएमआरडीए केएससी नवनगर विरोधी समितीचे सरचिटणीस रुपेश पाटील यांनी सरकारने तिसऱ्या मुंबईसाठी जाहीर केलेल्या भूसंपादनाच्या शासन निर्णयाची माहिती दिली. सरकारचे धोरण फसवे आणि शेतकरी विरोधी असून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणारे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी याला बळी पडू नये. आपण संघटीत राहून संघर्ष केला नाही तर भविष्यात आपली मूळ गावठाणाबाहेरील घरेही बेकायदेशीर ठरतील. सरकारने या सर्व घरांना सनद देऊन सुरक्षित करावे तसेच मूळ गावठाणाबाहेर ५०० मिटरपर्यंत गावठाण क्षेत्र जाहीर करावे. एमएमआरडीएने गावोगावी अशा प्रकारचे मार्किंग करून हद्दी निश्चित करत बेकायदेशीरपणे सर्वेक्षण सुरू केलं आहे. त्याला सर्वत्र विरोध होत आहे. याप्रसंगी समितीचे उपाध्यक्ष चंद्रशेखर ठाकूर, एड. पर्जन्य म्हात्रे, विपुल म्हात्रे, शशिकांत पाटील, प्रवीण म्हात्रे, अमेय पितळे, दिलीप म्हात्रे, हितेश म्हात्रे, अमृत म्हात्रे, निलेश म्हात्रे, धनेश म्हात्रे, अनिकेत ठाकूर, ओमकार गावंड, हर्षद पाटील, ओंकार म्हात्रे, सौरव पाटील, नमोद म्हात्रे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# रक्तदान शिबिरात १५३ जणांनी केले रक्तदान

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरूड महादेव कोळी समाज, महादेव कोळी समाज राजपुरी कोळीवाडा व डॉ. मंगेश पाटील यांचे श्रीयश हॉस्पिटल आणि शासकीय रक्तपेढी जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने यांच्या माध्यमातून आपण गेली ११ वर्ष रक्तदान सोहळ्याचे आयोजन करत आहात हा सोहळा एक अत्यंत स्तुत्य आणि सामाजिक उपक्रम आहे जो अनेक जणांचे प्राण वाचु शकतो.म्हणुन रक्तदान करणं मोठे कार्य आहे असे प्रतिपादन नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी आज रक्तदान सोहळा कार्यक्रमावेळी बोलत होते.

यावेळी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, स्त्रीरोग तज्ज्ञ आणि प्रस्तुती तज्ज्ञ डॉ. मंगेश पाटील, जंजिरा मेडिकल असोसिएशन मुरुड अध्यक्ष संजय पाटील, डॉ.श्रीया पाटील, अंजली पाटील, नगरसेवक मनोज भगत, सागर कन्या मच्छिमार सहकारी सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले, उपाध्यक्ष मनोहर मकु,, नगरसेवक



ॲड. रुपेश पाटील, चिंतामणी मकु, डॉ. दिपक गोसावी, डॉ. इप्सित पाटील, अभय पैर, नगरसेविका प्रिती चौलकर, नगरसेविका प्राजंली मकु, डॉ.मकबुल कोकाटे, उप पोलिस निरीक्षक अर्चना मोगरे, विजय गिदी, शैलेंद्र कुलाबकर, जितेंद्र मकु, रामदास निशानदार, प्रयाग कुलाबकर,ऋषिकेश बैले, ऋतिक मकु, चेतन मकु आदिंसह मान्यवर रक्तदाते उपस्थित होते.

शहरातील महिला रक्तदाते मैहजबिन जाबीर दखनी यांचा सन्मान नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांच्या शुभ हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी डॉक्टर मकबूल कोकाटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की माणसाने सर्वच क्षेत्रात अनेक शोध लावले आहेत. शरीरात कृत्रिम अवयव बसविले जातात; परंतु कृत्रिम रक्त तयार करण्याचे तंत्र अद्याप आत्मसात केलेले नाही.यामुळे रक्त किती महत्वाचा आहे तरी जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदान करावे असे आवाहन डॉक्टर मकबूल कोकाटे यांनी केले.

अभय पैर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की रक्तदान बरोबर देहदान महत्वाचं आहे.प्रत्येक अवयव शरीराचे महत्वाचं आहे हे अवयव जीवंत मानवांना उपयोगी पडु शकतो. तरी नागरिकांनी पुढे येऊन देहदान करावे असे आवाहन यावेळी अभय पैर यांनी केले.

रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दानफ असुन रक्तदान हे समाजसेवेसारख मोठं काम आहे. रक्तदानामुळे अनेकांना जीवनदान मिळते. कोणाला काहीतरी देण ही आजच्या घडीला खूप मोठी गोष्ट आहे. रक्तदानाकरिता मुरुड शहरासह राजपुरी कोळीवाड्यातील तरुण तरुणी व महिला रक्तदान करतात हे महादेव कोळी समाजाचे फार मोठ यश आसुन या योगदान लाभल्यामुळे आज १५३ रक्तदान विक्रमी नोंद करू शकलो, असे प्रतिपादन माजी वैद्यकीय अधिकारी तथा स्त्रीरोग तज्ज्ञ आणि प्रस्तुती तज्ज्ञ डॉ. मंगेश पाटील यांनी केले.

रक्तदाता हा रुग्णाचा देवदुत आहे.या रक्तदात्यांना एकत्र आणण्याचे काम डॉ. मंगेश पाटील यांनी करून समाजाबद्दल जागरुकता, बांधिलकी जोपासुन आज १५३ रक्तदात्यांनी रक्तदान केल्याबद्दल शासकीय रक्तकेंद्र अलिबाग, जिल्हा रुग्णालय रायगड यांच्यातर्फे डॉक्टर मंगेश पाटील यांना गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. भरत शिवाजी गोपाळे यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे चांदई, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ६९/५ एकुण ०.१४.७० गुंठे जमिन मिळकत विकत घेणार आहेत तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखी पुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यांनी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक ०६/०४/२०२६

ॲड. देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर हरकत नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीने सूचित करण्यात येते की, आमचे अशील श्री. मधुकर मोरेश्वर घरत, राहणार मु.पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड, यांच्यातर्फे खालीलप्रमाणे हरकत प्रसिद्ध करण्यात येत आहे:

१. श्री. हरिश्चंद्र मोरेश्वर घरत यांनी मौजे चौल, ता. अलिबाग येथील गट नंबर १५६७ (एकूण क्षेत्र ०.६४.२० हे.आर.) मधील ०.३२.१० हे. आर. क्षेत्राचा विक्री व्यवहार करण्याचे नियोजित केले असून त्याबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. त्या व्यवहारास आमचे अशील श्री. मधुकर मोरेश्वर घरत यांची तीव्र कायदेशीर हरकत आहे.

२. सदर मिळकतीबाबत तहसीलदार अलिबाग यांनी दि.११/१२/२०२४ रोजी पारित केलेला निर्णय आणि फेरफार नोंद क्र. ७४०२ विरुद्ध आमचे अशील श्री. मधुकर घरत यांनी माननीय उपविभागीय अधिकारी (SDO), अलिबाग यांच्या न्यायालयात आर.टी.एस. अपील दाखल केले असून त्याबाबतचा वाद न्यायप्रविष्ट आहे. तसेच उपरोक्त मिळकतीबाबत अलिबाग येथील दिवाणी कोर्टात रेग्युलर दरखास्त प्रलंबित आहे.

३. जोपर्यंत उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांच्या न्यायालयाचा अंतिम निकाल होत नाही व वर नमूद अलिबाग येथील दिवाणी कोर्टातील रेग्युलर दरखास्त निकाली होत नाही तोपर्यंत सदर मिळकतीचा कोणताही व्यवहार करणेस आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. तरी, कोणीही सदर मिळकतीबाबत श्री. हरिश्चंद्र मोरेश्वर घरत यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही आणि त्यातून होणाऱ्या कायदेशीर परिणामांस व्यवहार करणारी व्यक्ती स्वतः जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

ठिकाण: अलिबाग
दिनांक: ०५.०४.२०२६

सही/-
श्री. मधुकर मोरेश्वर घरत यांचेतर्फे वकील
ॲड. श्रीराम प्रमोद ठोसर

# रायगडावरील तलावांच्या कामाला गती

। महाड । प्रतिनिधी।

रायगड विकास प्राधिकरणमार्फत रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या व सध्या फुटका तलाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीन ऐतिहासिक तलावांचे संवर्धन व नुकसानग्रस्त भागांची पुनर्रचना करण्याचे काम वेगाने सुरू आहे. हे सर्व संवर्धन कार्य मूळ शिवकालीन वास्तुरचनेत कोणताही बदल न करता, पारंपरिक पद्धतीने करण्यात येत असून, या संवर्धनामुळे फुटका तलावांचे ऐतिहासिक महत्त्व तसेच जलसंधारणाची क्षमता वाढण्यास मदत होणार आहे.



रायगड किल्ल्यावर बाजारपेठेतून जगदीश्वर मंदिराकडे जाताना उजव्या बाजूस हे तीन तलाव नजरेस पडतात. शिवकाळात रायगडाच्या पाणीसाठ्याच्या दृष्टीने हे तलाव अत्यंत महत्त्वाचे होते. उतारांवर पक्के दगडी बांध घालून हे तलाव निर्माण केले गेले होते. मात्र, कालानुरूप या तलावांची बांधणी कमकुवत होऊन, दगड निखळून बांधाच्या भिंती ढासळल्या होत्या. तसेच, मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाणवठे बुजलेले होते. रायगड विकास प्राधिकरणाने या तीनही तलावांच्या संवर्धनाचे काम हाती घेतले असून, या कामांतर्गत बांधकामात उगवलेले गवत यांचे समूळ उच्चाटन केले आहे.

ढासळलेल्या दगडांचा बांधकामातील मूळ जागांचा अभ्यास करून त्यांची ऐतिहासिक पद्धतीने शास्त्रोक्त पुनर्रचना करण्यात आलेली आहे. प्रत्येकी २०० ते ३०० किलो वजनाचे हे मूळ दगड वापरूनच पारंपरिक पद्धतीने बांधकाम करण्यात आले आहे. या बांधकामाच्या मजबुतीसाठी दोन दगडांमध्ये लोखंडी कलम बसविले आहेत. शिवकालात जसे दिसत होते, तसेच आत्ताही दिसावेत अशा पद्धतीने संवर्धन करण्यात आलेले आहे.

त्याचबरोबर तलावामध्ये पाणीगळतीच्या ठिकाणांचा शोध घेऊन त्या ठिकाणी पारंपरिक चुन्याचे मिश्रण घालून शास्त्रोक्त पद्धतीने गळती काढण्याचे काम करण्यात आले आहे. पाणवठ्यात साचलेला गाळ काढण्याचेही काम सुरू असून, येणाऱ्या पावसाळ्यात तलाव काही प्रमाणात भरून साठवण क्षमतेची चाचणी घेतली जाणार आहे.

# ग्रामदेवांच्या भक्तीसाठी भाविक परतले गावात

। उरण । प्रतिनिधी ।

दरवर्षी दूरवर असलेल्या प्रियजनांना एकत्र आणून नात्यांची वीण घट्ट करणाऱ्या गाव यात्रांना शुक्रवारी सुरुवात झाली. चैत्र महिन्यात दरवर्षी गावातील गाव देव-देवीच्या जत्रा आणि यात्रांना सुरुवात होते. याची तयारी उरण तालुक्यातील विविध गावांत सुरू झाली आहे. उरणमधील जसखार येथील रत्नेश्वरी, करंजा येथील द्रोणागिरी, डोंगरी येथील अंबादेवी, नवीन शेवा येथील शांतेश्वरी आदी देवींच्या यात्रा या प्रसिद्ध आहेत.

या यात्रांमध्ये सहभागी होण्यासाठी गावाबाहेर नोकरी व्यवसायासाठी गेलेले ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने हजेरी लावतात. या यात्रांमध्ये गावातील हौशी कलाकार नाटक सादर करतात. यावेळीशासनकाठीनाचविण्याचीही प्रथा अनेक गावांत आहे. त्यासाठी ग्रामस्थ महिनाभर मेहनत घेतात. या यात्रांमध्ये मांसाहारी मेजवानी असते. तसेच दोन दोन दिवस चालणारे पालखी उत्सवही असतात. आजच्या आधुनिक काळातही शेकडो वर्षांची जत्रा आणि यात्रांची परंपरा कायम आहे.

### देव काठ्या नाचविण्याची प्रथा

चैत्र अमावस्येला कोप्रोली गावची ग्रामदेवता जोगेश्वरी माता व बापुजी यात्रा उत्सव पार पडणार आहे. या यात्रेत उंचच उंच देव काठ्या नाचविण्याची प्रथा आहे. यात्रेतील भाविकांकडून देव काठ्या नाचविण्याचा सोहळा पाहण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांची यात्रेला मोठी गर्दी उसळते. हा सोहळा १७ एप्रिल रोजी पार पडणार आहे.

फुंडे गावची घुरबा देवीची यात्रा ३ एप्रिल रोजी साजरी करण्यात आली. समुद्र किनाऱ्यावर वसलेल्या न्हावा गावाच्या डोंगरातील गावदेवीची यात्रा सुरू आहे. दोन ते तीन दिवस रंगणाऱ्या या यात्रेत पालखी सोहळा पाहण्यासाठी भाविकांची गर्दी उसळते. पालखी मिरवणूक गावभर फिरवण्यात येते. भाविकांच्या उत्साहामुळे देवीची पालखी माघारी मंदिरात येण्यासाठी कधी-कधी ३६ ते ४८ तासांहूनही अधिक कालावधी लागतो.

द्रोणगिरी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या द्रोणगिरी देवीची यात्रा ९ व १० एप्रिल रोजी पार पडणार आहे. देवीदेवतांनी सजवलेल्या चित्ररथातुन देवीची पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर जसखार ग्रामस्थांची प्रसिद्ध ग्राम देवता श्री रत्नेश्वरी देवीचा पालखी सोहळा १०, ११, १२ एप्रिल असा सलग तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. त्यानंतर गव्हाण गावच्या शांतादेवी आणि नवीन शेवा येथील शांतेश्वरी देवीची यात्रा -पालखी सोहळा ११ व १२ एप्रिल साजरा केला जाणार आहे. जसखार येथील रत्नेश्वरी देवीची यात्रा ही रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध आहे.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. कृष्णा आलू म्हात्रे रा. वडगांव, तालुका- पेण, जिल्हा-रायगड व इतर यांनी खालील वर्णनांच्या जमिन मिळकती ह्या सदर जमिनीचे विद्यमान मालक श्री. मंगलदास बन्सीलाल मानुधुने तर्फे श्री. हिरामण नारायण कोकाटे रा. तरशेत, तालुका- पेण, जिल्हा-रायगड यांचेकडुन रजिस्टर खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन त्याबाबत उभयतांमध्ये सविस्तर बोलणी झाली आहेत.

मिळकतीचे वर्णन जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका रोहा, मे. दुय्यम निबंधक रोहा यांचे कार्यक्षेत्रातील तलाठी सजा-वरवठणे, ग्रामपंचायत वरवठणे येथील जमिन मिळकतीचे ७/१२ प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे-

| मौजे | गट क्र. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| वरवठणे | ३६६ | ४-०४-०० | ६--२१ |
| वरवठणे | ३६७ | १-२८-०० | २--४४ |

वरील जमिन मिळकती ह्या या जाहीर नोटीसीचा विषय आहेत.

सदरच्या जमिन ह्या निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही सदर जमिनीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांना दिली आहे. तरी वरील जमिन मिळकती संदर्भात जर कोणाचा साठेकरार, गहाण, दान, जप्ती, लिन, लीज, चार्ज, जामिनकी, कब्जा, वारसाहक्क अगर कायदेशिर हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवशी पासून १४ (चौदा) दिवसांचे आंत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने कळवाव्यात.

जर वरील मुदतीत कोणाचीही लेखी हर-हरकत न आल्यास सदरच्या जमिन मिळकती ह्या निर्वेध व बोजाविरहित आहे व त्यावर इतर दुसरे कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध नाही असे समजुन माझे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर येणारी कोणतीही हरकत ही माझे अशिलांबर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण-रायगड.
दि. ०६/०४/२०२६.

सही/-
ॲड. संजय भास्कर पाटील
परमार प्लाझा, शॉप नं.१६. तळ मजला
शिवाजी पथ पेण-रायगड. ४०२१०७.
मोबा. ९८८१९१५२१९

# रुग्णालय होण्यासाठी प्रयत्न करणार

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत असलेल्या गावातील लोकसंख्या हि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या तीन पट झाली आहे.त्यामुळे कर्जत तालुक्यात नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात ग्रामीण रुग्णालय बनविण्यात यावे, अशी मागणी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बैठकीत जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे आणि पंचायत समितीच्या सदस्य भगवान चंचे यांनी केली.

दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्राचा आढावा घेतल्यानंतर जिल्हा परिषद सदस्य सुनीता मोरे यांनी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत याविषयी आवाज उठवणार असल्याचे प्रतिपादन केले.

कर्जत तालुक्यातील सर्वाधिक बाह्य रुग्णसेवा असलेल्या नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र मधील



■ **जि.प.सदस्य सुनीता मोरे यांचे प्रतिपादन**

जनतेला भेडसावरे आरोग्य प्रश्न यांची माहिती आणि आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.

त्यावेळी जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनीता मोरे, कर्जत पंचायती समितीचे सदस्य भगवान चंचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. संगीता मेढी उपस्थित होते.

जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे आणि पंचायत समिती सदस्य भगवान चंचे यांनी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन तेथील आरोग्य सुविधा, रुग्णसेवा आणि डॉक्टरांच्या अडचणी यांचा आढावा घेतला.नेरळ आणि परिसरातील वाढत्या लोकसंख्येला सक्षम आरोग्य सेवा मिळाली पाहिजे यासाठी नेरळ मध्ये ग्रामीण रुग्णालय उभारायचे आहे.

आरोग्य सेवा सुधारण्यासाठी प्रयत्न पायरमाळ येथील उपकेंद्राजवळील अतिक्रमण, कायमस्वरूपी वीजपुरवठ्यासाठी सोलर व्यवस्था, जनरेटरची गरज, आशा वर्कर्सची अपुरी संख्या आणि उपकेंद्र पातळीवरील निधीअभावी निर्माण होणाऱ्या अडचणी हे मुद्देही समोर आले. या सर्व प्रश्नांवर पाठपुरावा करून आरोग्य सेवा सुधारण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा विश्वास अधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख हेमंत क्षीरसागर, माजी शहर प्रमुख रोहिदास मोरे, नेरळ ग्रामपंचायत माजी सदस्य प्रथमेश मोरे, परेश सुर्वे, उदय मांडे यांच्यासह शिवसेना युवा कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य सेविका देखील यावेळी उपस्थित होत्या.

# पारितोषिक सोहळ्याचे आयोजन

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे दोशी वकील आर्ट्स कॉलेज अँड जी.सी. यू.बी. सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, गोरेगाव येथे वार्षिक पारितोषिक वितरण व पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा मंगळवारी (दि.७) रुक्मिणीबाई मंगल कार्यालय, गोरेगाव येथे संपन्न होणार आहे.

या सोहळ्यात विद्यार्थ्यांना पारितोषिके व पदवी प्रदान करण्यात येणार असून, कार्यक्रम संस्थेचे विश्वस्त व चेअरमन श्रीनिवास बेंडखळे यांच्या शुभहस्ते व अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. तसेच संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार खुळे, दिलीप शेठ, अरुणा शेठ, विनायक मोने, विवेक दोशी, प्रसाद मराठे तसेच संस्थेचे सदस्य उपस्थित राहणार आहेत.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# ग्रामीण खेळाडूंना व्यासपीठ दिले

## चित्रलेखा पाटील यांचे गौरवोद्गार




| रायगड | प्रतिनिधी |

क्रिकेटच्या खेळात आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी सज्ज असणाऱ्या युवकांना रामराज विभाग प्रीमिअर लीगने क्रीडा व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. विभागातील तब्बल अडीचशेहून अधिक खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्याची संधी गेले ४ वर्षे करीत आहे. लीगच्या नीटनेटक्या नियोजनामुळे अल्पावधीत संपूर्ण क्रीडा विश्वाचे लक्ष वेधले आहे. या स्पर्धेत खेळणारे आणि घडणारे क्रिकेटर आयएसपीएल आणि आयपीएल सारख्या स्पर्धांमध्ये निश्चितपणे नावलौकिक करतील, असा विश्वास शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी व्यक्त केला.

रामराजचे माजी सरपंच मोहन धुमाळ पुरस्कृत रामराज विभाग प्रिमिअर लिग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नांगरवाडी गावातील धावीर क्रीडांगणावर करण्यात आले. या स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी (दि.४) चित्रलेखा पाटील यांनी धावीर क्रीडांगण येथे भेट देऊन क्रिकेट स्पर्धेला शुभेच्छा दिल्या. यावेळी त्या बोलत होत्या. त्यांच्यासह व्यासपीठावर मोहन धुमाळ, मधुकर ढेवे, उत्तम रसाळ, अवधूत पाटील, मिहीर नाईक, आमिषा शेळके, निलेश मोरे, प्रियांका पाटील, चंद्रकांत बामणे, राजेंद्र वर्तक, सुनील धुमाळ, महादेव पाटील, गिरीश पाटील, मानसी धुमाळ, नाईक, नारायण गावडे, महेश झावरे, गिरीश ठाकूर, राहुल पाटील व समीर शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, धावीर क्रीडांगण निर्माण करण्यासाठी नांगरवाडी गावाने घेतलेली मेहनत वाखाणण्याजोगी आहे. नांगरवाडी गाव नेहमीच शेतकरी कामगार पक्षाबरोबर एकनिष्ठ राहिलेले आहे. या गावाने नेहमीच संघर्ष केला आहे. संघर्षातून यश निश्चित मिळते. गावाने केलेल्या संघर्षाचे फलित पुढील काळात निश्चित मिळेल. रामराज विभाग नेहमीच शेकापचा बालेकिल्ला राहिला आहे. त्यामुळेच शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांचे या विभागावर अधिक प्रेम आहे. या परिसरातील जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी शेकाप नेहमीच कटिबद्ध राहील, असे आश्वासन चित्रलेखा पाटील यांनी दिले.

# चार संघ उपउपांत्य फेरीत दाखल

रामराज विभाग प्रीमियर लीगच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या दहा सामन्यांमधून चार संघ सुपर आठमध्ये दाखल झाले आहेत. या संघांमध्ये फरिहा इलेव्हन रामराज मोहल्ला, आई जाखमाता दिवी पारंगी, अर्णव इलेव्हन भोनंग आणि एम झेड सप्लायर्स उमटे या संघांचा समावेश आहे. हे चारहि संघ पहिल्या दिवशी सुपर आठमध्ये पोहचलेल्या संघांबरोबर भिडणार आहेत. उपउपांत्य फेरी, उपांत्य फेरी आणि अंतिम फेरी असा या स्पर्धेतील सात सामन्यांचा खेळ शिल्लक राहिला आहे. या पुढील सामने बॅड फेरीतील असणार आहेत, असे आयोजकांनी सांगितले.

दुसऱ्या दिवशी पहिल्या फेरीतील पहिला सामना फरीहा इलेव्हन रामराज मोहल्ला आणि छोटू इलेव्हन दिवी पारंगी या संघांमध्ये झाला. हा सामना फरीहा इलेव्हन रामराज मोहल्ला या संघाने जिंकला. दुसरा सामना जेपी फायटर्स सुडकोली आणि आई जाखमाता दिवी पारंगी या संघांमध्ये झाला. या सामन्यात जेपी फायटर्स सुडकोली या संघाने बाजी मारली. तिसरा सामना श्लोक ११ धावीर महान आणि अर्णव ११ भोनंग या संघांमध्ये झाला. या सामन्यात अर्णव ११ भोनंग संघ विजयी झाला. तर, चौथा सामना साईश्री प्रणय ११ नांगरवाडी आणि एमझेड सप्लायर्स उमटे या संघांमध्ये झाला. या सामन्यात एमझेड सप्लायर्स उमटे विजयी झाला.

दुसऱ्या फेरीमध्ये पहिला सामना फरीहा इलेव्हन रामराज मोहल्ला विरुद्ध आई जाखमाता दिवी पारंगी यांच्यात झाला. या सामन्यामध्ये आई जाखमाता दिवी पारंगी या संघाने विजय मिळवला. दुसरा सामना अर्णव ११ भोनंग आणि एमझेड सप्लायर्स उमटे या संघांमध्ये झाला. या सामन्यात एमझेड सप्लायर्स उमटे या संघाने विजय मिळवला. तिसरा सामना छोटू इलेव्हन दिवी पारंगी आणि जेपी फायटर्स सुडकोली यान संघांमध्ये झाला. या सामन्यात छोटू इलेव्हन दिवी पारंगी हा संघ विजयी झाला. चौथा सामना श्लोक ११ धावीर महान आणि साईश्री प्रणय ११ नांगरवाडी या संघांमध्ये झाला. या सामन्यात श्लोक ११ धावीर महान हा संघ विजयी झाला. पाचवा सामना फरीहा इलेव्हन रामराज मोहल्ला विरुद्ध छोटू इलेव्हन दिवी पारंगी या दोन संघांमध्ये झाला. या सामन्यात फरीहा इलेव्हन रामराज मोहल्ला संघ विजयी झाला. दुसऱ्या दिवसातील शेवटचा म्हणजेच सहावा सामना श्लोक ११ धावीर महान आणि अर्णव ११ भोनंग या संघांमध्ये झाला. या सामन्यात अर्णव ११ भोनंग या संघाने विजय मिळवत उपउपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला.

# समीर रिझवीच्या सामनावीरची हॅट्ट्रिक

समीर रिझवी सोळा वर्षांचा असताना त्याच्या वडिलांचं निधन झालं. समीर रिझवी हा एक युवक त्याक्षणीच एक जबाबदार कर्ता पुरुष बनला. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्याच्यावर पडली. कुटुंबाच्या जबाबदारीच्या ओझ्याखाली दबून न जाता, त्याने क्रिकेटपटू होण्याचा आपलं स्वप्न कायम जपलं. त्या स्वप्नाचा तो तेव्हापासूनच पाठलाग करायला लागला. खरंतर त्याच्या वडिलांना वाटायचं त्याने अभ्यास करून चांगलं शिकावं, आणि कुटुंबाचा भार अंगाखांद्यावर घ्यावा. पण तसं काही प्रत्यक्षात घडलं नाही. तो शिक्षणाबरोबरच क्रिकेटची आराधना करत राहिला. त्याला उजव्या हाताचा सुरेश रैना म्हणायचे. कारण तो रैनाप्रमाणेच फिरकी गोलंदाजांवर तुटून पडायचा. त्याच्या गोलंदाजीची कत्तल करायचा. त्याची ही प्रतिभा दस्तूरखुद्द सुरेश रैनानेच पाहिली होती.

ते वर्ष बहुदा २०११ असावं. सुरेश रैना त्याच्या फलंदाजीवर बेहद्द खुश होता. त्याने स्वतःचा गॉगल काढून त्याला भेट म्हणून त्या क्षणी दिला होता. सुरेश रैनाच का, उत्तर प्रदेशातील तमाम क्रिकेट रसिक त्याच्या फटकेबाजीच्या अदाकारीवर खुश होते. त्यांचा तो आवडता खेळाडू होता. वयाच्या सोळाव्या वर्षीच त्याने उत्तर प्रदेश क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. वर्षभरात त्याच्या नावाचा उत्तर प्रदेशच्या क्रिकेट मैदानावर बोलबाला झाला होता. कारण तो झंजावाती फलंदाजी करायचा. त्याने वर्षभरातच शतकामागून शतकं झळकावण्याचा सपाटा लावला. तो एक पॉवर हीटर म्हणून उदयास येत होता. युपी २० लीगमध्ये त्याने दोन शतकं झळकावून त्याची निवड योग्य असल्याचा सिद्ध केलं.




विनायक दळवी

वर्षभरातच म्हणजे २०२३च्या हंगामात त्याने आणखी एक मोठ्या विक्रमाला गवसणी घातली. त्याने अवघ्या ९७ चेंडू द्विशतक झळकावलं. २३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेतील तो एक विक्रम आहे. क्रिकेटच्या मोठ्या व्यासपीठावर येण्यासाठी ते पुरेसं ठरलं. कारण त्याला चेन्नई सुपर किंगने पहिल्याच हंगामात तब्बल ८ कोटी ४० एवढ्या घसघशीत रकमेने करारबद्ध केलं. अफगाणिस्तानचा गाजलेला फिरकी गोलंदाज रशीद खान याच्या चेंडूवर षटकार मारून त्याने आपल्या आयपीएल कारकिर्दीची सुरुवात केली. मात्र, आयपीएल पदार्पणाशिवाय ते वर्ष त्याला काही चांगलं गेलं नाही. कारण आठ डावांमध्ये त्याला एकूण ५१ धावाचं काढता आल्या. पुढच्या हंगामात चेन्नई सुपर किंगने त्याला कायम ठेवलं नसल्याचे, आश्चर्य वाटलं नाही. मात्र, दिल्ली कॅपिटल संघाने त्याला स्थान दिल्यानंतर, त्याच्या गुणवत्तेला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असं वाटतं. कारण त्याने पंजाब विरुद्ध सामन्यात २५ चेंडूत ५८ धावांची खेळी करून दिल्ली कॅपिटल्सला विजय मिळवून दिला आणि आपली क्षमता सिद्ध केली. लखनऊ जायंटविरुद्ध सामन्यात ४७ चेंडूत नाबाद ७० धावा केल्या आणि पुन्हा एकदा दिल्ली कॅपिटलने त्याच्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवला. आणि परवा मुंबईच्या बलाढ्य गोलंदाजीच्या आक्रमणाविरुद्ध आणि ५१ चेंडूत ९० धावा फटकावल्या आणि दिल्ली कॅपिटलला सहज विजय मिळवून दिला. वर उल्लेख केलेल्या तीन डावांमुळे त्याला सामन्यातील सर्वोत्तम खेळाडू, म्हणजे सामनावीर पुरस्कार मिळाला. सामनावीर पुरस्काराची हॅट्रिक करणारा समीर रिझवी हा विराट कोहली आणि जोस बटलर यानंतरचा केवळ तिसरा फलंदाज आहे. समीर उजव्या हाताने फलंदाजी करणारा मधल्या फळीतील खेळाडू आहे. तो उत्तम फिरकी गोलंदाजी देखील करतो. त्यामुळे त्याला सध्याच्या मर्यादित षटकांच्या युगातील, एक उत्तम अष्टपैलू खेळाडू म्हणून ओळखलं जातं. त्याचे पदलालित्य उत्तम आहे. त्यामुळे फटकेबाजी करताना चेंडूपर्यंत पोहोचून, तो लिलया फटके खेळत असतो. त्यामुळे प्रेक्षकांना देखील एक आक्रमक फलंदाजीचा आनंद लुटता येतो. आयपीएल पदार्पणातील हंगामातील अपयशानंतर समीर खूपच गोष्टी शिकला. त्या अपयशातून त्याने स्वतःला वेगळ्या पद्धतीने 'मोल्ड' केलं. ज्याचा प्रत्यय यंदाच्या हंगामात त्याने सलग तीन सामनावीर पुरस्कार पटकाविल्यानंतर आला. समीरसाठी क्रिकेट जगतात मोठी संधी आहे. कारण त्याचं वय (२३) त्याच्या पाठीशी आहे. आयपीएलमुळे त्याला अनेक उत्तम गोलंदाज आणि फलंदाज तसेच मार्गदर्शक यांच्यासोबत सल्लामसलत करण्याची संधी मिळाली आहे. पाहूया यंदाच्या आयपीएल हंगामात, समीर आणखी कोणते कोणते उच्चांक, विक्रम आणि पराक्रम करतो ते.

# राजधानीत रिझवी नावाचे वादळ

- ५१ चेंडूंत ९० धावांची आतषबाजी
- दिल्लीचा मुंबईवर दणदणीत विजय



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आयपीएल २०२६ स्पर्धेच्या आठव्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स संघ भिडले. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने ६ गडी राखत बाजी मारली. या सामन्यात समीर रिझवीच्या वादळी खेळीने दिल्लीचा विजय सोपा झाला.

दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून मुंबई इंडियन्सला प्रथम फलंदाजीची संधी दिली. हा सामना खेळण्यासाठी हार्दिक पांड्या फिट नसल्याने मुंबईचे नेतृत्व सूर्यकुमार यादवने सांभाळले. मुंबईचे सलामिवीर रोहित शर्मा आणि रायल रिकेल्टन मैदानात उतरले. परंतु, दिल्लीने तिसऱ्याच षटकात दोन धक्के दिले. रायन रिकेल्टन (९) व तिलक वर्मा (०) स्वस्त्यात माघारी परतले. मात्र, रोहित शर्मा व सूर्या यांनी ३९ चेंडूंत ५३ धावांची भागीदारी पूर्ण केली. परंतु, चेंडू कव्हर्सच्या वरून मारण्याच्या प्रयत्नात रोहित (३५) झेलबाद झाला. त्यानंतर शेरफान रुथरफोर्ड (५) मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला. सूर्या एकाबाजूने मैदानता टिकून उभा होता आणि त्याने ३५ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. परंतु, तो ५१ धावांवर पायचीत झाला. त्यानंतर नमन धीरने २८ धावांची खेळी करताना मुंबईला दीडशेपर्यंत पोहोचवले, परंतु १९व्या षटकात तो बाद झाला. तर, मिचेल सँटनर (१८) व कॉर्बिन बॉश (११) यांच्या खेळीने मुंबईला ६ बाद १६२ धावांपर्यंत पोहोचवले. कुलदीप यादव (१०.३३) सोडल्यास दिल्लीच्या सर्व गोलंदाजांनी ९ पेक्षा कमी इकॉनॉमीने धावा दिल्या. मुकेशने २ महत्त्वाचे बळी घेतले. तर, लुंगी एनगिडी, अक्षर पटेल, विपराज निगम आणि टी नटराजन यांनी प्रत्येकी १ बळी टिपला.

मुंबईने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात निराशाजनक झाली आणि दीपक चहरच्या चौथ्या चेंडूवर के. एल. राहूल (१) झेलबाद झाला. त्यानंतर जसप्रीत बुमराहने नितीश राणाला (०) पायचित केले. त्यानंतर पथून निसंका व इम्पॅक्ट प्लेअर समीर रिझवी यांनी ४९ चेंडूंत ६६ धावांची भागीदारी करून दिल्लीला सावरले. मात्र, मिचेल सँटनरने निस्संकाला ४४ धावांवर झेलबाद केले. त्यानंजतर रिझवीने ११व्या षटकात ४,४,६,६ अशा २० धावा चोपल्या आणि पुढच्याच षटकात अर्धशतक देखील पूर्ण केले. तो ५१ चेंडूंत ७ चौकार व ७ षटकारांसह ९० धावांवर बाद झाला. मात्र, त्याने दिल्लीच्या बाजूने सामना पूर्णपणे झुकवला. त्यानंतर मिलरने (२१) हा सामना १८.१ षटकात संपवला आणि दिल्लीला ६ गडी राखून विजय मिळवून दिला.



# खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राला अजिंक्यपद

| अहिल्यानगर | प्रतिनिधी |

खो-खो इंडियातर्फे अथागड-ओडिशा येथे अधिकृत राष्ट्रीय कुमार-कुमारी ज्युनियर खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या कुमार संघाने कर्नाटकवर रोमांचक विजय मिळवत अजिंक्यपद पटकाविले.

पहिल्या डावात महाराष्ट्र व कर्नाटक दोन्ही संघांनी ८-८ गुणांची बरोबरी साधली. दुसऱ्या डावातही दोन्ही संघांनी जोरदार खेळ करत १०-१० गुणाने सामना बरोबरी आणला. निकालासाठी अतिरिक्त डाव खेळविण्यात आला. अतिरिक्त डावात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करत १०-८ गुणांनी विजय मिळविला. महाराष्ट्राने अवघ्या एक गुणांनी हा थरारक सामना जिंकत अजिंक्यपदावर नाव कोरले. या अंतिम सामन्यात रवी दरगौडा, आदेश मदन, ओम दिवशे, संभाजी मदन, रोहित चारवंडे, कार्तिक पवार आणि रोहन महाजन यांनी संरक्षण व आक्रमणामध्ये दमदार कामगिरी केली. यावेळी सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून रवी दरगौडाचा गौरव करण्यात आला. तर, सर्वोत्कृष्ट संरक्षक म्हणून संभाजी मदन याला सन्मानित करण्यात आले.

# अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची निवड

| पुणे | प्रतिनिधी |

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या अध्यक्षपदी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बिनविरोध निवड जाहीर झाली. खो-खो, कबड्डी, कुस्ती आणि मल्लखांबसारख्या परंपरागत खेळांमध्ये राज्य असोसिएशनच्या अध्यक्षपदी पहिल्यांदाच महिला विराजमान झाल्याने हा क्षण सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. सुनेत्रा पवार यांची निवड ही केवळ पदभरती नसून, महाराष्ट्राच्या क्रीडा इतिहासातील मोठी झेप मानली जात आहे. यापूर्वी हॉकी आणि रायफल संघटनांमध्ये महिला अध्यक्ष होत्या; मात्र, खो-खो क्षेत्रात अनेक वर्षांनी हा सन्मान महिलेला मिळाला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या या पदावर सुनेत्रा पवार यांनी एकहाती बाजी मारत नवा अध्याय सुरू केला आहे. पुण्यातील बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात रविवारी (दि.५) विशेष सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी अध्यक्षपदासाठी निवडणूक अपेक्षित होती. मात्र, अध्यक्षपदासाठी एकच अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध झाली. निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. धीरज कोल्हे यांनी अधिकृत घोषणा करताच सभागृहात उत्साहाची लाट उसळली. या वेळी लोकेश्वरा (उपाध्यक्ष, भारतीय खो-खो महासंघ व कर्नाटक असोसिएशन) आणि प्रदीप खांडरे (महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन) निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

# विक्रमाला गवसणी

| अहमदाबाद | वृत्तसंस्था |

वैभव सूर्यवंशीने पुन्हा एक वादळी खेळी करून विक्रमाला गवसणी घातली आहे. राजस्थान रॉयल्सच्या सलामीवीराने यशस्वी जैस्वालसोबत मिळून मोठा पराक्रम केला. या दोघांनी वीरेंद्र सेहवाग-गौतम गंभीर यांचा विक्रम मोडला. शिवाय वैभवने आणखी एका विक्रमात रिषभ पंत व इशान किशन यांनाही मागे सोडले. या सामन्यात वैभवने पहिलाच चेंडू चौकार खेलचा आणि आयपीएलमध्ये यशस्वी जैस्वालसह मोठा विक्रम मोडला. सर्वात कमी चेडूंत ५०० धावांची भागीदारी करणारी ही जोडी ठरली. त्यांनी वीरेंद्र सेहवाग व गौतम गंभीर (३०९) यांचा विक्रम मोडला. तसेच, १९ वर्षांपर्यंत किंवा खालील आयपीएलमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याच्या रिषभ पंतच्या (३०) विक्रमाशी वैभवने बरोबरी केली.



# मापगाव प्रीमिअर लीग उत्साहात

| सोगाव | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील मापगाव येथील गावदेवी क्रीडा मंडळ आयोजित मापगाव प्रीमिअर लीग रविवारी (दि.२९) अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. या भव्य लीगची सुरुवात येथील दत्त मंदिरात पारंपरिक पद्धतीने श्रीफळ वाढवून व छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर गावातील मुख्य मार्गाने क्रीडांगणाकडे भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये मान्यवर, ग्रामस्थ, महिलावर्ग आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उद्घाटन मापगावचे माजी सरपंच सुनिल थळे, सचिन घाडी, सुचित थळे, चंद्रकांत खोत, परेश सुर्वे, संजय शिंदे, विवेक जोशी, साहिल कूर तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. या स्पर्धेत राजवीर ११ संघाने प्रथम क्रमांक पटकावला असून एस.के. वॉरियर्स मापगाव संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. मापगाव प्रीमियर लीगमुळे गावातील तरुणांना एकत्र येण्याची, क्रीडागुणांना वाव देण्याची आणि एकोपा वाढवण्याची सुंदर संधी मिळाली. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल गावदेवी क्रीडा मंडळाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## टागोर नगर चषकाचे आयोजन | मॅटवर रंगला कबड्डीचा थरार

# विक्रोळीच्या नवरत्न मंडळाची बाजी

| मुंबई | प्रतिनिधी |

टागोर नगर मित्र मंडळातर्फे जिल्हास्तरीय पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा विक्रोळी (पू.) येथील साईबाबा मंदिर शेजारील मैदानातील मॅटवर पार पडल्या. या स्पर्धेत प्रथम श्रेणी पुरुषांत विक्रोळीच्या नवरत्न मंडळाने टागोर नगर चषक पटकविला. तर, महिलांत हा मान कुर्ल्याच्या एस.आय.ई.एस. या संघाने मिळविला.



प्रथम श्रेणी पुरुषांच्या सुरुवातीपासुन चुरशीने खेळला गेलेल्या अंतिम सामन्यात सामन्यात पहिल्या डावात विक्रोळीच्या नवरत्न मंडळाकडे १३-१० अशी आघाडी होती. दुसऱ्या डावात त्याच संयमाने खेळ करीत चेंबूर क्रीडा केंद्राचा कडवा प्रतिकार २७-२१ असा मोडून काढत ७ गुणांच्या फरकाने सामना खिशात टाकला. रोहन शेडगे, गौरव पाटील, ओमकार तांबे यांच्या चतुरस्त्र खेळाला याचे श्रेय जाते. चेंबूरच्या चिराग पाटील, ओमान तोमर, कुणाल पवार यांचा खेळ संघाला विजयी करण्यात कमी पडला. यावेळी नवरत्न मंडळाला रोख रक्कम १५ हजार रुपये व टागोर नगर चषक देऊन गौरविण्यात आले. तर, उपविजेत्या चेंबूर संघाला रोख रक्कम १० हजार रुपये व चषकावर समाधान मानावे लागले. यावेळी नवरत्न मंडळाचा रोहन शेडगे स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. तर, चेंबूरचा कुणाल पवार व नवरत्नचा ओमकार तांबे यांची अनुक्रमे उत्कृष्ट चढाई व पकडीचा खेळाडू म्हणून निवड करण्यात आली.

महिलांच्या अंतिम सामन्यात कुर्ल्याच्या एस.आय.ई.एस.ने भांडुपच्या स्नेहविकास मंडळावर ३७-१४ अशी सहज मात करीत टागोर नगर चषकावर आपले नाव कोरले. एस.आय.ई.एस. ने पूर्वार्धात आस्था सिंग हिच्या तुफानी चढाया आणि तिला आर्या देवकर, तनुश्री शिंदे यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे २ लोण देत २३-०२ अशी आघाडी घेत विजयाचा पाया रचला. उत्तरार्धात सावध खेळ करीत आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. उत्तरार्धात स्नेहविकासच्या समृद्धी शेळटकर, रिया तावडे यांनी थोडा फार प्रतिकार केला. त्यामुळे एस.आय.ई.एस.ने रोख रक्कम ८ हजार रुपये व टागोर नगर चषकावर आपले नाव कोरले. तर, उपविजेत्या स्नेहविकासला रोख रक्कम ५ हजार रुपये व चषकावर समाधान मानावे लागले. यावेळी आय.ई.एस.ची आस्था सिंग हि स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली. तर, स्नेहविकासची रिया तावडे व एस.आय.ई.एस.ची तनुश्री शिंदे यांची अनुक्रमे उत्कृष्ट चढाई व पकडीचा खेळाडू म्हणून निवड करण्यात आली.

# रेड्डी, क्लासेनची दमदार खेळी

| हैद्राबाद | वृत्तसंस्था |

आयपीएल स्पर्धेत रविवारी (दि.५) १०वा सामना हैदाराबादमध्ये सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध लखनौ सुपर जायंट्स संघात पार पडला. या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सने गोलंदाज चमकले असले, तरी सनरायझर्स हैदराबादसाठी नितीश कुमार रेड्डी आणि हन्रिक क्लासेन यांनी दमदार फलंदाजी केली. संकटात सापडलेल्या हैदराबादला क्लासेन आणि नितीश कुमार रेड्डी यांनी बाहेर काढले. या दोघांनीही अर्धशतक साकारले. मात्र, त्यांची ११६ धावांची भागीदारी १८व्या षटकात एम. सिद्धार्थने तोडली. त्याने नितीशला झेलबाद केले. नितीशने ५६ धावा केल्या. त्याच्या पुढच्या षटकात मात्र आवेश खानने सलग दोन चेंडूंवर क्लासेन आणि हर्ष दुबे यांना बाद केले. क्लासेन ६२ धावांवर बाद झाला. तर, दुबे शून्यावर बाद झाला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)